मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक - श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ८५ | बुधवार, ०३ डिसेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




## थोडक्यात

### सक्रिय सिमवरच व्हॉट्सअ‍ॅप चालणार

**नवी दिल्ली :** व्हॉट्सअ‍ॅपसारख्या मेसेजिंग ॲपना फक्त सक्रिय सिमसह काम करण्याची सक्ती दूरसंचार विभागाच्या निर्णयामुळे राष्ट्रीय सुरक्षा मजबूत होईल, असे दूरसंचार उद्योग संघटना सीओएआयने म्हटले आहे. अशा सलग जोडणीमुळे सिम कार्ड आणि त्याच्याशी संबंधित कम्युनिकेशन ॲपद्वारे केलेल्या कोणत्याही क्रियाकलापांसाठी जबाबदारी आणि ट्रेसेबिलिटी सुनिश्चित होते, अज्ञातता आणि गैरवापर करण्यास सक्षम असलेल्या दीर्घकालीन अंतरांना दूर करते, संघटनेने म्हटले आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षा ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास ८ डिसेंबरपर्यंत दिली मुदतवाढ

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २२ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेमार्फत देण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे.

### रांगोळीकार

**श्री. आशिष लक्ष्मण मुकादम रा. जि. प. शाळा तळवडे आदि. वाडी केंद्र न्हावे ता. रोहा जि. रायगड**



# सर्व निकाल २१ डिसेंबरला

## मतमोजणीच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाराज

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये काल (२ डिसेंबर) २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडली. अशातच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या मतमोजणीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सर्व नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी एकत्र जाहीर करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. "पहिल्यांदाच असं घडतंय" असे म्हणत या संपूर्ण प्रक्रियेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**२० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम**

काही ठिकाणी मतदान आधी पार पडले असले, तरीही निकाल घोषित



करण्याची तारीख बदलता येणार नाही, असे कोर्टाने नमूद केले आहे. यासोबतच २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहिल, असेही कोर्टाने स्पष्ट केले असून तोपर्यंत एक्झिट पोल प्रसिद्ध करण्यासही बंदी असणार आहे.

**...पण असं पहिल्यांदा घडलं**

न्यायालयाच्या या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "हा निर्णय खंडपीठाने दिला आहे, तर तो सगळ्यांना मान्यच करावा लागेल.

मी मागील २५ ते ३० वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहत आलो आहे. पण असं पहिल्यांदा घडत आहे की, घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत. त्याचे निकाल पुढे चालले आहेत. ही जी काही पद्धत आहे ती योग्य वाटत नाही", असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली.

**निवडणूक आयोगामुळे सर्वांचा भ्रमनिरास**

पुढे ते म्हणाले, "माझी नाराजी निवडणूक आयोगावर नाही, तर संपूर्ण प्रक्रियेत दिसलेल्या उणिवांवर आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अशी अव्यवस्था निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे मेहनत करणारे उमेदवार, प्रचार करणारे कार्यकर्ते यांचा भ्रमनिरास होतो.

यंत्रणेच्या चुकांमुळे अशा गोष्टी घडणे योग्य नाही".

## कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत वारशाचेही जतन करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :**दक्षिण गंगा असलेल्या गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग अत्यंत कौतुकास्पद आहे.

'विकास भी, विरासत भी' हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश मार्गदर्शक असून कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत ऐतिहासिक वारशाचेही जतन करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज, मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' समारंभपूर्वक सूचीबद्ध करण्यात आला.




या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आशिष चौहान, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक परिसरात कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामे होत आहेत. राज्य शासनाने नगरविकास विभागामार्फत कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक असलेली अनेक पायाभूत कामे हाती घेतली आहेत. कुंभमेळ्याचे पावित्र्य कायम राखत विकास पुढे नेला जाईल. यासाठी अनेक योजना तयार केल्या असून त्या कार्यान्वित करण्यात येत आहेत.

## कोकणात सहलीला गेलेल्या नाशिकच्या विद्यार्थ्यांची बस पुलावरून कोसळली

### ४२ विद्यार्थी जखमी, चारजण गंभीर

**दैनिक युवक आधार**

**सातारा, प्रतिनिधी :**कोकणात सहलीसाठी गेलेल्या नाशिकमधील विद्यार्थ्यांच्या बसला अपघात झाला आहे. या अपघातात ४२ हून अधिक विद्यार्थी जखमी झाल्याची माहिती आहे. विद्यार्थ्यांची बस कोकणातून मंगळवारी परत नाशिकला येत असताना पुणे-बंगळूरू महामार्गावर हा अपघात झाला. कराड तालुक्यातील वाठार गावच्या हद्दीत विद्यार्थ्यांची बस पुलावरून खाली कोसळली. जखमी ४२ विद्यार्थ्यांपैकी चारजण गंभीर असल्याचं सांगण्यात येत आहे.

**रस्त्याचा अंदाज न आल्यानं बस पुलावरून कोसळली :** नाशिकच्या निफाडमधील बी.पी. महाविद्यालयाचे विद्यार्थी सहलीसाठी कोकणात गेले होते. कोकणातून सातारामार्गे नाशिकला परतत असताना पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी पहाटे या बसचा अपघात झाला. वाठार (ता. कराड) गावच्या हद्दीत पुलाचं काम सुरू आहे. पहाटे अंधार असल्यानं बस चालकाला रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज आला नाही. अशा स्थितीत बस भराव पुलावरून खाली कोसळली. या अपघाताची माहिती मिळताच विद्यार्थ्यांचे



पालक भयभीत झाले होते. अपघाताची माहिती घेण्यासाठी ते कराड पोलिसांशी संपर्क साधत होते.

**चार विद्यार्थी गंभीर :** या अपघातात बस मधील ४२ हून अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यातील चार विद्यार्थी गंभीररित्या जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. सर्व जखमी विद्यार्थ्यांना कराडच्या कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच कराड ग्रामीण आणि महामार्ग मदत केंद्राच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाठार गावच्या ग्रामस्थांनींनीदेखील पोलिसांना मदत केली.

**जखमींवर उपचार सुरू :** जखमी विद्यार्थांमधील १० जणांवर कराडच्या वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर तात्काळ पाच उपाययोजना कराव्यात – उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :** मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक



घेतली. सदर महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी, नवा रिंगरोड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय यंत्रणेने तत्काळ राबवावयाच्या पाच महत्त्वपूर्ण उपाययोजना घोषीत कराव्यात, अशा ठोस सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, पुणे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांचे वरिष्ठ अभियंते, वाहतूक पोलीस, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई पुण्यासह राज्यात यंदा हुडहुडी वाढणार;! तापमानातील पारा घसरला, थंडीच्या लाटेचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** बंगालच्या उपसागरातील वादळाचा परिणाम ओसरला असून, राज्यात आता हुडहुडी भरविणारी थंडी पुन्हा परतली आहे. मराठवाडा तसेच मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट पसरली असून, सोमवारी



सोलापूर जिल्ह्यातील जेऊर येथे सर्वात कमी ९ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. पालघर, नवी मुंबई, ठाणे येथे रात्रीच्या वेळी चांगलाच गारठा जाणवत असून मुंबईतही पारा घसरणार आहे. पुढील दोन ते तीन दिवस तापमानातील ही घट कायम राहणार असल्याचेही हवामान विभागाने अंदाजात म्हटले आहे.

**थंडीच्या लाटेचा इशारा**

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात आज (दि.२) थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, अहिल्यानगर, जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार आदी जिल्ह्यात थंडीची लाट पसरली असून, ती मंगळवारीदेखील कायम राहणार आहे.

## बिबट्याच्या दहशतीच्या वातावरणातही मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :**

राज्यातील २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. उत्तर पुण्यातल्या निवडणूक प्रचारादरम्यान दिसलेलं बिबट्याचं सावट आता प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीही परिणाम करू शकेल असं वाटत असतानाच मतदारांनी उत्साह दाखवला आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्या वेगवेगळ्या ठिकाणी फिरताना आढळल्यामुळं परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. या भीतीनं प्रचारावर जसा परिणाम झाला, तसाच परिणाम मतदानावरही होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

**मतदानाच्या दिवशी थेट परिणाम होणार का?:** प्रचारादरम्यान उमेदवारांना संध्याकाळी मतदारांपर्यंत पोहोचण्यात मोठं आव्हान उभं



राहिलं होतं. अंधार पडण्यापूर्वी प्रचार आटपावा लागल्यानं अनेक सभा रद्द कराव्या लागल्या किंवा वेळ बदलावी लागली. एवढंच नव्हं तर अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांसारख्या दिग्गज नेत्यांनीही गर्दी कमी होऊ नये म्हणून दिवसाच्या वेळेत सभा घेण्याचा निर्णय घेतला. हे चित्र परिसरातील भीतीचं गांभीर्य स्पष्ट करतंय. आजच्या मतदानाच्या दिवशी या परिस्थितीचा थेट परिणाम दिसू शकतो. पहाटे आणि सकाळच्या सत्रात बिबट्या शिकारीसाठी अधिक सक्रिय असतो, असा वनविभागाचा अंदाज असल्यानं अनेक मतदार घराबाहेर पडण्यास घाबरू शकतात.

'मतदानाला जाताना बिबट्या अचानक समोर आला तर?' अशी भीती अनेकांच्या मनात घर करून आहे.

विशेषतः वयोवृद्ध आणि एकटे राहणाऱ्या नागरिकांमध्ये ही चिंता अधिक दिसते. त्यामुळं मतदान केंद्रांवर गर्दी कमी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**मतदान करणं हा आपला हक्क :** बिबट्याची दहशत असताना ७३ वर्षीय आजीनं न घाबरता मंचर नगरपंचायत प्रभाग ४ अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, लोंढेमळा या मतदान केंद्रावर सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावला, तर जुन्नर इथं देखील ८० वर्षीय आजोबांनी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, देशाची लोकशाही बळकटीकरणाच्या कामी बिबट्याची दहशत बाळगण्याची गरज नाही, मतदारांनी पुढं येऊन मतदान करावं, असं आवाहन या ज्येष्ठ नागरिकांनी केलंय.

## "संचार साथी ॲपची सक्ती म्हणजे देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न"; काँग्रेसचा हल्लाबोल

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**देशभरात सायबर फसवणुकीच्या अनेक घटना समोर येत असताना केंद्र सरकारने डिजिटल सुरक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे. दूरसंचार विभागाने (DOT) सर्व स्मार्टफोन उत्पादक कंपन्यांना राज्य सरकारद्वारे विकसित करण्यात आलेले सायबर सिक्युरिटी 'संचार साथी' हे ॲप प्रत्येक डिव्हाइसमध्ये प्री-इन्स्टॉल करण्याचे निर्देश सोमवारी (दि.१) दिले.

'संचार साथी' या ॲपमुळे फसवणुकीचे कॉल-मेसेज, तसेच हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल यांची माहिती नागरिकांना त्वरित नोंदवता येणार आहे. सरकारच्या या निर्णयावर आता विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. काँग्रेसच्या सरचिटणीस आणि खासदार प्रियंका गांधी यांनी "संचार साथी ॲपची सक्ती म्हणजे देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न" असे म्हणत या निर्णयाला आज (दि.२) विरोध केला आहे.




**थेट पाळत ठेवण्याचे साधन**

खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या, "संचार साथी हे ॲप म्हणजे थेट पाळत ठेवण्याचे साधन आहे आणि हे अगदीच हास्यास्पद आहे. प्रत्येक नागरिकाला गोपनीयतेचा हक्क आहे. कुटुंबीयांना, मित्रांना मेसेज करण्यासाठी सरकारने प्रत्येक गोष्ट पाहावी, हा विचारही चुकीचा आहे."

**..तर देशाला मार्गाने हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न**

पुढे त्या म्हणाल्या, "ही फक्त फोनवरची पाळत नाही तर देशाला मार्गाने हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न आहे. संसद चालत नाही कारण सरकार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास नकार देत आहे. विरोधी पक्षाला दोष देणे सोपे आहे, पण चर्चा टाळली जाते. ही लोकशाही नाही. लोकशाहीत चर्चा आवश्यक असते. मतभेद असतात, ते ऐकले जातात."

**सायबरसुरक्षा आवश्यक पण त्या नावाखाली...**

"फसवणुकीची तक्रार नोंदवणे आणि देशातील प्रत्येक नागरिक आपल्या फोनवर काय करत आहे, हे पाहणे यामध्ये खूप फरक आहे. गोष्टी अशा चालत नाहीत. फसवणुकीविरुद्ध प्रभावी व्यवस्था असावी, हे आम्ही सायबरसुरक्षेच्या चर्चांमध्ये नेहमी सांगितले आहे. सायबरसुरक्षा आवश्यक आहे, पण त्या नावाखाली नागरिकांच्या फोनमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारला नाही. कोणत्याही नागरिकाला हे मान्य होणार नाही." असे म्हणत प्रियंका गांधी यांनी 'संचार साथी' ॲपला विरोध दर्शवला.

**गोपनीयतेच्या हक्कांचे उल्लंघन**

विरोधकांच्या मते, "या नियमामुळे नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेच्या हक्कांचे उल्लंघन होईल आणि संविधानिक अधिकारांनाही धोका निर्माण होईल. हे ॲप मोबाईल सिस्टममध्ये प्रवेश करू शकते, सुरक्षा ॲप्लिकेशन हटवू शकते आणि एकदा सिस्टम लेव्हलवर बसवल्यानंतर ते काढताही येणार नाही."

# उरण तालुक्यात भात कापणी झोडणीची कामे अंतिम टप्प्यात

## जेएनपीए तर्फे गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनांची हाताळणी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरणाने शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी कामगार आणि रोजगार मंत्रालय आणि महानिर्देशालय ,कारखाना सल्ला सेवा आणि श्रम संस्थान यांच्या सहकार्याने" गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनींची हाताळणी" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या आयोजन केले होते.

जेएनपीए बिजनेस फॅसिलिटेशन सेंटर येथे आयोजित या कार्यशाळेत बंदर प्रशासन टर्मिनल ऑपरेटर्स सुरक्षा तज्ञ आपत्कालीन प्रतिसाद पथके आणि उद्योग क्षेत्रातील तज्ञ यांनी सहभाग घेतला.

बंदरांवर हाताळलेल्या जाणाऱ्या धोकादायक माला विषयी जागरूकता वाढवणे, आणि कार्यप्रणालीतील सज्जता अधिक बळकट करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

हा उपक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतीचा नियमित बंदर कार्यप्रणालीमध्ये समावेश करून एक सक्षम सुरक्षित आणि नियमांचे पालन करणारा कार्य परिसर निर्माण करण्यासाठी जेएनपीएचा सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

या कार्यशाळेत तज्ञांच्या नेतृत्वाखाली तांत्रिक सत्रांची मालिका होती ,ज्यात महत्त्वाच्या सुरक्षा विषयांचा समावेश पुढील



प्रमाणे :-

१)धोकादाय पदार्थांच्या हाताळणी संदर्भात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचे विहंगावलोकन करणे .

सहभागीना बंदर परिसंस्थेमध्ये धोकादाय पदार्थांच्या हालचाली नियंत्रित करणाऱ्या प्रमुख नियामक चौकटी, आंतरराष्ट्रीय अधिवेशने तसेच कायदेशीर बंधने याबाबत सहभागीना माहिती देण्यात आली.

२) धोकादायक माल हाताळण्यात क्षमता आणि पर्यवेक्षण तज्ञांनी अपघात टाळण्यासाठी आणि सुरक्षित कामकाजासाठी प्रशिक्षित कर्मचारी कौशल्य विकास आणि योग्य पर्यवेक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

३) बंदर परिसरातील किरणोत्सर्ग संरक्षण आणि आपत्कालीन तयारी या सत्रामध्ये किरणोत्सर्ग सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रोटोकॉल, निरीक्षण यंत्रणा आणि हे किरणोत्सर्गाशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीना सामोरे जाण्यासाठी ची तयारी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण तालुक्यात भात कापणी व झोडणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मात्र सर्वत्र शेत मजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी वर्ग त्रासला आहे. निसर्ग चक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भीती शेतकऱ्यांच्या मनात आहेच. अशातच आता तोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांची भात कापणी झोडणीची धावपळ सुरू आहे. परंतु भात कापणीसाठी वेळेत मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदील झाले आहेत. नाईलाजाने शेतकरी कुटुंबातील नातेवाईकांच्या मदतीने भात कापणीची कामे करताना दिसत आहेत.

विशेषता: या भागात आदिवासी स्त्री पुरुष मजुरांची मोठी संख्या आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांना हा हंगामी रोजगार मिळाला आहे. एकेकाळी भात कापणी झाल्यानंतर भात पिकांची कडवे चार दिवस चांगली वाळल्यानंतरच त्याचे भारे बांधून ते उडव्यात रचून ठेवले जात असत. त्यानंतर शेतातच खळा



तयार करून, त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून, त्यानंतर त्या खळ्यावर भात पिकाच्या मळणीची प्रक्रिया केली जात होती. परंतु सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट आणि त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून शेतकरी पिके न वाळविताच तसेच त्याची साठवणूक न करताच शेतकरी ताबडतोब कापलेले भातपीक झोडून भात घरी आणत आहेत.

एकेकाळी उरण तालुका हा भाताचे कोठार समाजला जात होता. परंतु मागील काही वर्षापासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत आहे. भातशेती हि पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओल्या दुष्काळाला, तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली न आणता त्या ओसाड ठेवल्या जात आहेत. त्यामुळे या भागात शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे.

उरण तालुक्यात भात कापणी व झोडणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मात्र सर्वत्र शेत मजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी वर्ग त्रासला आहे. निसर्ग चक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भीती शेतकऱ्यांच्या मनात आहेच. अशातच आता तोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांची भात कापणी झोडणीची धावपळ सुरू आहे. परंतु भात कापणीसाठी वेळेत मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदील झाले आहेत. नाईलाजाने शेतकरी कुटुंबातील नातेवाईकांच्या मदतीने भात कापणीची कामे करताना दिसत आहेत.

विशेषता: या भागात आदिवासी स्त्री पुरुष मजुरांची मोठी संख्या आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांना हा हंगामी रोजगार मिळाला आहे. एकेकाळी भात कापणी झाल्यानंतर भात पिकांची कडवे चार दिवस चांगली वाळल्यानंतरच त्याचे भारे बांधून ते उडव्यात रचून ठेवले जात असत. त्यानंतर शेतातच खळा तयार करून, त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून, त्यानंतर त्या खळ्यावर भात पिकाच्या मळणीची प्रक्रिया केली जात होती. परंतु सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट आणि त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून शेतकरी पिके न वाळविताच तसेच त्याची साठवणूक न करताच शेतकरी ताबडतोब कापलेले भातपीक झोडून भात घरी आणत आहेत.

एकेकाळी उरण तालुका हा भाताचे कोठार समाजला जात होता. परंतु मागील काही वर्षापासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत आहे. भातशेती हि पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओल्या दुष्काळाला, तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली न आणता त्या ओसाड ठेवल्या जात आहेत. त्यामुळे या भागात शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**कॉलेजकट्टा/ आरती सुरवसे** : उरण-फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने 1 डिसेंबर 2025 रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.हा कार्यक्रम कार्यवाह प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य गजानन चव्हाण होते, तर जेएनपीए हॉस्पिटलच्या डॉ. वर्षा यादव





या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच आरोग्य सेवा कर्मचारी उज्वला निकाळजे, सुषमा म्हात्रे आणि पूजा गावंड उपस्थित होत्या आरोग्य सेविका उज्वला निकाळजे यांनी एड्स विषयक मूलभूत माहिती, प्रतिबंध आणि जनजागृतीचे महत्त्व यावर प्रबोधनपर व्याख्यान दिले. तर डॉ. वर्षा यादव यांनी विद्यार्थ्यांची जागरूकता वाढवून समाजातील एड्ससंबंधित गैरसमज व कलंक दूर करण्याची गरज यावर भर देत त्यामुळे होणारे मानवी श्रमशक्तीचे नुकसान व आरोग्य सेवेवरील ताण तणाव याची सखोल माहिती दिली.आपल्या अध्यक्षीय भाषणात गजानन चव्हाण यांनी एड्स रुग्णांप्रती समाजातील वर्तनाची उदाहरणे सांगितली आणि विद्यार्थ्यांनी संवेदनशीलता तसेच स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल पालवे उपस्थित होते.कार्यक्रमाचे समन्वयन आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल पाटील यांनी केले. डॉ. आर. एस. जावळे आणि डॉ. धरती घरत यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य केले. या जनजागृती कार्यशाळेस बी.एस्सी. तील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दिव येथे श्री दत्तजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पेण वार्ताहर:** श्री क्षेत्र दत्त देवस्थान पिंगळ आळी, दिव-पो .वाशी, ता.पेण , जि.रायगड याठिकाणी सालाबाद प्रमाणे गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जन्मोत्सव सोहळा भक्तिभावाने साजरा होणार आहे.यावेळी बुधवार दि.३ डिसेंबर रोजी सायं. ६.०० वाजता श्री विठाई महिला भजन मंडळ (कळवे) यांच्या भजनाचा कार्यक्रम व रात्री ठिक ९:०० वा. कीर्तनकार कीर्तनभूषण ह भ.प. सौ. वेदश्री वैभव ओक यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. तसेच गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते २: ०० श्री औदुंबर प्रासादिक संगीत भजन मंडळ, दिव यांचा भजन कार्यक्रम तर २:३० ते ३:३० वा. ह.भ.प श्री कृष्णा बापू पाटील ( दिवपाडा) यांचे प्रवचन व सायंकाळी सायं. ४.०० ते ६.०० ह.भ.प सौ. वेदश्री वैभव ओक यांचे श्री दत्तजन्मोत्सवाचे



कीर्तन होईल. दोन दिवस चालणाऱ्या कीर्तनाच्या या कार्यक्रमात हार्मोनियम साथ - संतोष शांताराम पाटील, तबलासाथ सुभाष शांताराम पाटील, घोडाबंदर यांची लाभणार आहे.त्यानंतर आरती , तीर्थप्रसाद, महाप्रसाद असे कार्यक्रम संपन्न होतील .याच दिवशी रात्रौ ९:३० वा. संगीत भजनाची जुगलबंदी होणार असून त्यामध्ये जय गणेश प्रासादिक भजन मंडळ होनाड (खोपोली), गायक सागर बुवा भोरडे व व्याघ्रेश्वर भक्तिरंग प्रासादिक भजन मंडळ वऱ्हाड, (सुधागड -पाली) गायक धीरज बुवा खंडागळे यांच्यात संगीत भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी, बेडेकऱ्यांनी या श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्यात भक्तिभावाने सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

Best Opportunity For



House Wife
Retired
Teacher
Businessman

We are fastest growing organization
Work Fulltime or Part time as per your requirement
No Target, No Investmant
Reward & Recognition
Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067


**जेएनपीए तर्फे कामगार व रोजगार मंत्रालय तसेच डीजीएफएएसएलआय यांच्या सहकार्याने**

# 'गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनांच्या हाताळणी' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/ प्रदीपपाटील** : भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जेएनपीए) शुक्रवारी, 28 नोव्हेंबर रोजी, कामगार आणि रोजगार मंत्रालय (एमओएलई) आणि महानिदेशालय, कारखाना सल्ला सेवा आणि श्रम संस्थान (डीजीएफएएसएलआय) यांच्या सहकार्याने 'गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनांच्या हाताळणी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. जेएनपीए बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर (बीएफसी) येथे आयोजित या कार्यशाळेत बंदर प्रशासन, टर्मिनल ऑपरेटर्स, सुरक्षा तज्ज्ञ, आपत्कालीन प्रतिसाद पथके आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी सहभाग घेतला. बंदरांवर हाताळल्या जाणाऱ्या धोकादायक मालाविषयी जागरूकता वाढवणे आणि कार्यप्रणालीतील सज्जता अधिक बळकट करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

हा उपक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींचा नियमित बंदर कार्यप्रणालीमध्ये समावेश करून एक सक्षम, सुरक्षित आणि नियमांचे पालन करणारा कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी जेएनपीएच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे. या कार्यशाळेत तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालील तांत्रिक सत्रांची मालिका होती ज्यात महत्त्वाच्या सुरक्षा विषयांचा समावेश होता. 1. धोकादायक पदार्थांच्या हाताळणीसंदर्भातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचे विहंगावलोकन करणे, सहभागींना बंदर परिसंस्थेमध्ये धोकादायक पदार्थांच्या हालचाली नियंत्रित करणाऱ्या प्रमुख नियामक चौकटी,, आंतरराष्ट्रीय अधिवेशने तसेच कायदेशीर बंधने याबाबत सहभागींना माहिती देण्यात आली. 2. धोकादायक माल हाताळण्यात क्षमता आणि पर्यवेक्षण तज्ञांनी अपघात टाळण्यासाठी आणि सुरक्षित कामकाजासाठी प्रशिक्षित कर्मचारी कौशल्य विकास आणि योग्य पर्यवेक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. 3. बंदर परिसरातील किरणोत्सर्ग संरक्षण आणि आपत्कालीन तयारी या सत्रामध्ये किरणोत्सर्ग सुरक्षिततेसाठी




आवश्यक प्रोटोकॉल, निरीक्षण यंत्रणा आणि किरणोत्सर्गाशी संबंधित आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्यासाठीची तयारी यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. 4. धोकादायक रासायनिक दुर्घटनांपासून बंदर सुरक्षा, डीजीएफएएसएलआयच्या तज्ज्ञांनी बंदर परिसरातील रासायनिक धोक्यांची ओळख, प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाययोजना आणि दुर्घटना नियंत्रणासाठीच्या विशेष रणनीती यांवर मार्गदर्शन केले. 5. धोकादायक रासायनिक अपघातांमुळे उद्भवणाऱ्या वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींचे निवारण, वैद्यकीय व सुरक्षा तज्ञांनी प्रथमोपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, आरोग्य यंत्रणांशी समन्वय आणि घटनेनंतरची व्यवस्थापन प्रक्रिया याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

जेएनपीए येथे आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा भारतातील प्रमुख बंदरांमध्ये घातक रसायन व्यवस्थापन मजबूत करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या देशव्यापी क्षमता-निर्मिती उपक्रमाचा एक भाग आहे. या कार्यक्रमाला जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांच्यासह जेएनपीएचे सर्व विभागप्रमुख व मुख्य अतिथी अणुऊर्जा नियामक मंडळाचे एइआरबी) अध्यक्ष श्री दिनेश कुमार शुक्ला, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (एनडीएमए) माजी सदस्य आणि एचएसई ग्रुप, बीएआरसीचे माजी प्राधिकरणाचे (एनडीएमए) माजी सदस्य आणि एचएसई ग्रुप, बीएआरसीचे माजी संचालक डॉ. डी. एन. शर्मा, डीजीएफएएसएलआयचे उपमहासंचालक श्री सुमित रॉय, आयआयटी मुंबई येथील रासायनिक अभियांत्रिकीचे प्राध्यापक डॉ. संदीप रॉय आदी मान्यवर उपस्थित होते. एईआरबी, बीएआरसी, आयआयटी बॉम्बे आणि डीजीएफएएसएलआय येथील येथील वरिष्ठ तांत्रिक तज्ञांनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि मौल्यवान वैज्ञानिक, नियामक आणि कार्यान्वयन संबंधी मार्गदर्शन केले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## वनवर्ल्ड वुमेन नेटवर्क'तर्फे डॉ. किरण बेदी यांच्या हस्ते सीकेटी महाविद्यालयाला 'शैक्षणिक भागीदार' चा विशेष सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** वन वर्ल्ड वुमेन नेटवर्क' या संस्थेद्वारे आयोजित 'निर्भय नेतृत्व' या महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स (अधिकार प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाने 'शैक्षणिक भागीदार' म्हणून सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती अंशुल शर्मा, श्रीमती जयश्री काटकर, श्रीमती गरिमा शर्मा, डॉ. स्वाती पडोशी आणि डॉ. अनुरिता गौतम यांनी केले होते. या प्रेरणादायी कार्यक्रमाला देशातील पहिल्या महिला आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी यांची 'प्रमुख अतिथी' म्हणून विशेष उपस्थिती लाभली. महाविद्यालयाचे विद्यार्थी परिषद, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि प्लेसमेंट सेल क्लबचे असे एकूण ७० विद्यार्थी या सत्रात सहभागी झाले होते.

या कार्यक्रमादरम्यान सीकेटी महाविद्यालयाचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. किरण बेदी यांच्या हस्ते महाविद्यालयाला सन्मानपत्र प्रदान करण्यात आले, जो संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारा क्षण होता. महाविद्यालयीन स्तरावर हे सन्मानपत्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.



डॉ. एस. के. पाटील आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाने प्राप्त झाले. प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रो. सत्यजित कांबळे यांनी महाविद्यालयाच्या वतीने हे सन्मानपत्र स्वीकारले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्लेसमेंट सेल विभागाचे अध्यक्ष प्रो. सत्यजित कांबळे, विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष डॉ. सूर्यकांत परकाळे, लेफ्टनंट नीलिमा तिदार , प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी श्रीमती आरती कागवाडे, प्लेसमेंट समन्वयक श्रीमती श्रुती कोळी, राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी श्री. आकाश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. रूपेश माने आणि प्लेसमेंट अधिकारी कौस्तुभ सोमण यांनी सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयाला मिळालेला 'शैक्षणिक भागीदार'चा हा सन्मान संस्थेच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांमधील योगदानाची निश्चितच ग्वाही देतो.

# विचार विमर्श या साप्ताहिक वृत्तपत्राचा प्रकाशन सोहळा जल्लोषात संपन्न

### दै.युवक आधार चे पत्रकार श्री.रमेश राऊत यांना आदर्श पत्रकार म्हणून गौरवन्यात आले

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** ठाणे शहरातून प्रकाशित होणाऱ्या मराठी साप्ताहिक विचार विमर्श या वृत्तपत्राचा प्रकाशन सोहळा सोमवार दि.१डिसेंबर रोजी ठाणे येथील जी.जी. एज्यूकेशन पॅरामेडिकलच्या सभागृहात नुकताच मोठ्या थाटात पार पडला.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक विजय सुर्यवंशी, उद्योजक समाजसेवक विजय यादव, जी.जी.पॅरामेडिकल सायन्स चे चेअरमन डॉ.गौतम गोसावी, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढागळे, उद्योजक व जनस्वराज्य वेल्फेअर ट्रस्टचे अध्यक्ष राजन पाटील, ०४ महाराष्ट्र न्यूज चॅनेल चे मुख्य संपादक श्रावण पाटील, जेष्ठ पत्रकार विलास सावंत यांच्या



शुभहस्ते या वृत्तपत्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विजय सुर्यवंशी म्हणाले की, आजच्या काळात वृत्तपत्र चालविणे म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखे आहे, पत्रकारीतेचा स्तर वाढवणे गरजेचे आहे. समाजाला चांगल्या पत्रकारांची गरज आहे.विचार विमर्श चे संपादक हिरादास सोनावले यांची पत्रकारितेतील प्रतिमा अतिशय सत्य व स्वच्छ आहे. असे गौरवोद्गार काढले. पत्रकार हा समाजाचा आरसा आहे.

आज पत्रकारांमुळेच आमच्या सारख्यांना समाजाच्या घडामोडी कळत असतात. विचार विमर्श च्या पुढील वाटचालीस माझ्या मनापासून शुभेच्छा देतो. असे विजय यादव म्हणाले

इतर मान्यवर व्यक्तींनी ही विचार विमर्श च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व हिरादास सोनावले यांच्या पत्रकारिते बद्दल गौरवोद्गार काढले.

याप्रसंगी विचार विमर्श च्या प्रकाशन सोहळ्याचे औचित्य साधून हिरादास सोनावले यांनी शिव स्वामी फाउन्डेशन या त्यांच्या ट्रस्ट च्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. यामध्ये शोभा लोणारे यांना आदर्श समाजसेविका, संध्या म्हसकर (आदर्श समाजसेविका), अॅड.रचना भालके (आदर्श कायदेतज्ञ), रमेश राऊत (आदर्श पत्रकार), अंजली हडवले (आदर्श समाजसेविका), राजेंद्र मालवे (आदर्श मानवसेवा) , पल्लवी शिंगारे ( आदर्श आरोग्यसेवा), रामदास वाढवणे (आदर्श आध्यात्मिक सेवा), दिलीप सुराणा(आदर्श मानवसेवा), कु. भाविक तिवारी (आदर्श कलारत्न) , श्रावण पाटील (आदर्श पत्रकार), डॉ. तेजस्विनी गोसावी (आदर्श आरोग्य सेवा), सदाशिव चव्हाण (आदर्श समाज रत्न) , वैशाली न्यायनिर्गुणे (आदर्श साहित्य सेवा), विलास सावंत (आदर्श उद्योगसेवा), रंजना तिवारी (आदर्श योग शिक्षीका), नानासाहेब खैरे (आदर्श मानवसेवा), छाया वाढवणे (आदर्श उद्योगसेवा), नरेंद्र पाटील (आदर्श समाजसेवक), शैला मराठे(आदर्श समाजसेविका), तनुजा बेलोटे(आदर्श कलासेवा), जयवंत मसणे( आदर्श समाजसेवक) राजेंद्र गोसावी (आदर्श मानवसेवा), चंद्रकांत वाघमारे (आदर्श पत्रकार), जगदीश सोनटक्के (आदर्श समाजसेवक), राजकुमार शर्मा (आदर्श मानवसेवा), भास्कर केदारे (आदर्श शिक्षक),ललिता गडकरी (आदर्श समाजसेविका), जीवन नाबर (आदर्श समाजसेवक)या सन्माननीय व्यक्तींचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर व सन्माननीय व्यक्तींचे संस्थापक व संपादक हिरादास सोनावले यांनी आभार मानले व राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पुस्तकाची नकली प्रत विकणारा ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नकली पुस्तकांची विक्री करणाऱ्या पुस्तक विक्रेत्यास खांदेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून 125 पुस्तकांच्या प्रती जप्त करण्यात आल्या.नवीन पनवेल येथील संविधान महोत्सवात जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाच्या नकली प्रतीची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर खांदेश्वर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी विक्रेता मनमोहन मिश्रा

## गांधी महाविद्यालयाच्या मुलींचा बास्केटबॉल संघ विद्यापीठात प्रथम, खेळाडूंचा अनेक मान्यवरांकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयाच्या महिला बास्केटबॉल संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयास गौरवाचा सन्मान मिळवून दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे २३ व २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेत, गांधी महाविद्यालयाच्या मुलींनी अंतिम सामन्यात देवगिरी महाविद्यालयाचा ५७-४८ अशा गुणांनी पराभव करून विजयश्री मिळवली. संघाला प्रा. डॉ. जमीर सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले होते.



विद्यापीठ स्तरावर झालेल्या या यशामुळे संघास विविध मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.या स्पर्धेत संघाच्या कु. निकीता बाबासाहेब पोकळे या खेळाडूची स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाल्याने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या निमित्ताने सरपंच संदीप खकाळ, अजित डिसले, जितेंद्र बनकर, बंडु जाधव, बिबीषन पोकळे, बाबासाहेब पोकळे, संदीप जाधव, विक्रम नरवडे, बाळू पोकळे, उद्धव पोकळे, शिवम पोकळे, क्रीडा शिक्षक जमीर सय्यद, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सदस्य, संचालक मंडळ, प्राचार्य, सर्व स्टाफ, विद्यार्थी व पालक यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.

## १८ वर्षांखालील मुलांनी गाडीला हात लावू नका; न्हावाशेवा पोलिसांचे विद्यार्थ्यांना कडक निर्देश

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी कु. सायली साळुंके :** वाहतूक नियमांचे पालन न केल्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी आणि भावी पिढीला लहानपणापासूनच वाहतूक शिस्त लावण्यासाठी न्हावाशेवा वाहतूक शाखेने एक महत्त्वाचा पुढाकार घेतला आहे. उरण तालुक्यातील सोनारी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत आयोजित एका विशेष प्रबोधन कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गलांडे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षेचे धडे दिले.

**वाहन चालवताना 'वयाची अट' बंधनकारक**

कार्यक्रमादरम्यान, श्री. गलांडे यांनी विद्यार्थ्यांना 'सुरक्षेचा मंत्र' दिला. त्यांनी स्पष्ट केले की, १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय



कोणत्याही विद्यार्थ्याने वाहन चालवण्याचा हट्ट करू नये. अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे हे केवळ बेकायदेशीर नाही, तर स्वतःच्या आणि इतरांच्या जीवासाठी धोकादायक आहे. तसेच, १८ वर्षे पूर्ण झाल्यावरही शिकाऊ परवाना (Learning License) असताना, दुचाकी चालवताना मागे कायमस्वरूपी (पक्के) लायसन्स असलेल्या व्यक्तीला बसवणे कायद्याने बंधनकारक आहे, याची माहिती त्यांनी दिली.

**मुलांवर सोपवली मोठी 'सुरक्षा जबाबदारी'**

केवळ नियम पाळणे इतकेच नाही, तर विद्यार्थ्यांनी आता घरातही 'पोलीस मित्र' म्हणून काम करावे, असे आवाहन पोलिसांनी केले. "जेव्हा तुमचे आई-वडील घराबाहेर पडतील, तेव्हा त्यांना हेल्मेट किंवा सीटबेल्ट लावायला सांगा. ट्रिपल सीट प्रवास करणे आणि रॉंग साईडने (विरुद्ध दिशेने) गाडी चालवणे जीवावर बेतू शकते, हे पालकांना समजावून सांगा," असे भावनिक आवाहन श्री. गलांडे यांनी मुलांना केले.सिग्नल तोडणे आणि वेगावर नियंत्रण नसणे हे अपघाताचे मूळ कारण आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या या प्रबोधन कार्यक्रमाला शाळेतील सुमारे ७० ते ८० विद्यार्थी उपस्थित होते.

## सोनाली कोल्हेची राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी :** तालुक्यातील सिंदफणा माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. सोनाली पंढरीनाथ कोल्हे हिची खो-खो असोसिएशनमार्फत अहिल्यानगर (अहमदनगर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याच्या संघामध्ये निवड झाली आहे. शिरूर कासार तालुक्यातील शिंतभना आश्रम शाळेचे विद्यार्थिनी कु. सोनाली पंढरीनाथ कोल्हे हिची खो-खो असोसिएशनमार्फत अहिल्यानगर (अहमदनगर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याच्या संघामध्ये निवड झाली आहे. तिच्या यशाबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.संग्राम सेवाभावी संस्थेचे सचिव श्री. राजकुमार पालवे यांच्या हस्ते सोनालीचे अभिनंदन करण्यात आले आणि तिला पुढील



स्पर्धेसाठी भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. भाऊसाहेब सरवदे, सिद्धपना आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. खरमाटे सर, प्रशिक्षक श्री. तावरे सर, तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांची उपस्थित होती. बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना तसोनाली निश्चितच उत्कृष्ट कामगिरी करील याची खात्री आहे.

## अधिवेशनासाठी पर्यावरण पूरक हातमागावरील कापडांचे बुके

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव / नागपूर :** हातमागावर पारंपरिक कापडांच्या निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची ओळख आहे. प्रादेशिक वैशिष्ट्यांनुसार स्थानिक कलावंत या कापडाची निर्मिती करतात. विधिमंडळ अधिवेशनानिमित्त हातमाग महामंडळाने फुलांच्या बुके ऐवजी आकर्षक व पर्यावरण पूरक कापडाचा बुके तयार केला आहे. कापडाचा बुके या संकल्पनेला चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.विविध समारंभामध्ये फुलांचा बुके देण्याची परंपरा आहे. त्याऐवजी कायम स्मरणात राहील आणि बुकेतील साहित्य दैनंदिन वापरासाठी उपयुक्त ठरेल, अशा हातमागावरील विविध कापडांचा समावेश असलेले आणि तेवढेच आकर्षक कापडाचे बुके पहिल्यांदाच हातमाग महामंडळाने तयार केले आहेत. अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतांच्या स्वागतासाठी हा बुके निश्चितच संस्मरणीय ठरणार आहे.

नागपूर हे मध्य भारतातील हातमागाचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते. हात मागावरील विविध तयार कपड्यांना संपूर्ण देशात मागणी आहे. रेशीम साडयांपासून टावेल, चादर, रुमाल, सूती साडया आदी कापड हातमागावर स्वदेशी डिझाईनचा वापर करुन तयार करण्यात येते. यासाठी प्रादेशिक वैशिष्ट्यानुसार तसेच फॅशनचा अभ्यास करुन कलात्मक व कौशल्याचा वापर करुन पर्यावरण पूरक वस्त्रांची निर्मिती केली जाते. शासनाने हातमाग उद्योगाचा विकास करण्यासाठी राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रमाची आखणी केली आहे. त्यामुळेच येथील हातमागवरील वस्तूचे आकर्षण आहे. ही परंपरा पिढयानपिढया जपली जात असतानाच व्यवसायातील तंत्रज्ञानाचे जतन करताना आधुनिकतेची जोड मिळत असल्यामुळे हा समृध्द वारसा जतन होत आहे.हातमाग महामंडळातर्फे विणकरांना प्रोत्साहन देण्यासोबतच नवनिर्मित कापडांच्या निर्मितीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन



देण्यात येत आहे. हातमागावरील निर्मित कापडाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्यामुळेच बाजारपेठेसोबतच स्पर्धा करण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहेत. फुलांच्या बुकेपेक्षा परवडेल अशा किमतीत कापडांचा बुके तयार करण्यात आला आहे. कापडी बुके ही संकल्पना उमरेड रोडवरील हातमाग महामंडळाच्या केंद्रात सुरु करण्यात आली असून, नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सहव्यवस्थापकीय संचालक गंगाधर गजभिये यांनी सांगितले. नागपुरी साडी, कोसा, सिल्क आदी दर्जेदार कापड हातमागावर तयार करण्यात आलेल्या बुकेसोबत आकर्षक कापडी बॅग तयार करण्यात आली आहे. कापडी बुकेमध्ये नॅपकीन, रुमाल, टॉवेल आदींचा समावेश करण्यात आला आहे. त्यासोबतच हस्तकलेद्वारे निर्मित केलेल्या बकेटमध्ये विविध प्रकारचे हातमाग कापडांचा समावेश असलेले व तेवढयाच आकर्षक संवेष्टनात कापडी बुके उपलब्ध आहेत.

## अखेर सिडको प्रशासन जागे...

### चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या कामाला लवकरच होणार सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सिडकोच्या नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात अखेर सिडको प्रशासन जागे झाले असून, या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. या विषयी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे लक्ष वेधून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली होती. त्यानुसार नागरिकांचा हा प्रश्न निकाली लागला आहे.


चिपळे पूल ते नेरे हा अत्यंत महत्त्वाचा आणि दररोजची रहदारी असलेला रस्ता असून, सध्या त्याची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. यापूर्वी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होता, मात्र त्याचे सिडकोकडे हस्तांतरण झाल्यानंतर तो नैना हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि उखडलेल्या भागांमुळे नागरिकांची ये-जा अत्यंत धोकादायक व त्रासदायक झाली आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांमध्ये सिडकोविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नागरिकांची मागणी आणि त्यांना होणाऱ्या गैरसोयीची दखल घेत, आमदार ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन देऊन सिडको अधिकाऱ्यांना या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली होती. तसेच हा रस्ता प्रचंड वर्दळीचा असल्याने त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. त्यानुसार सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे भाजपचे पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांना सांगितले. यामुळे प्रवाशी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळाचे संचालक तसेच पनवेल महानगरपालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.त्याचबरोबर चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स



कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष मा. प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ.मनोज वर्मा , मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक व मुंबई उपनगर सचिव डॉ. निलम पाटील यांची उपस्थिती लाभली.

या स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठातील ४२२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच पुरुषांमध्ये प्रथम सर्वोत्कृष्ट खेळाडूचे स्थान ठाकूर महाविद्यालय, कांदिवली, द्वितीय स्थान आर.जे. महाविद्यालय, घाटकोपर आणि तृतीय स्थान के. ई. श्रॉफ महाविद्यालय, कांदिवली यांनी पटकावले त्याचबरोबर महिला विभागामध्ये प्रथम सर्वोत्कृष्ट खेळाडूचे स्थान ठाकूर महाविद्यालय, कांदिवली, द्वितीय स्थान एस.आय.ई.एस महाविद्यालय, नवी मुंबई आणि तृतीय वर्तक महाविद्यालय, वसई यांनी पटकावले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्की, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील जिमखाना विभागाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### खरिपाने दिला दगा ; आता रब्बीकडे बघा !

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे पाथरी :-** यावर्षी अतिवृष्टीमुळे कपाशी सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने पाथरी तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले पावसाच्या संततधारेमुळे कापसाची बोंडे सडली सोयाबीनचे पिके तर पाण्यात बुडाले यामुळे उत्पादनात ६० ते ७० टक्के घट झाली यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला खरिपाने दगा दिल्याने आता शेतकरी राजा रब्बी पिकांकडे वळले आहेत अतिवृष्टी सह गोदावरी नदीच्या पुराच्या पाण्यामुळे मोठ नुकसान झाले तर आता शेतकरी कसाबसा सावरत असून संकटातून मार्ग काढत रब्बीच्या पेरणी व पिकाच्या निगराणी कडे वळले आहेत गेल्या आठवड्यापासून शेतकरी आपल्या शेतातील उरला सुरला कापूस उपटून टाकत आहे आणि गहू हरभरा पेरणीसाठी तयारी करत आहेत आता शेतकरी मुख्य पिक म्हणून गहू हरभरा या कडे वळले आहेत ज्वारी करडई यांची पेरणी कमी प्रमाणात करत आहेत तर आता गहू चांगला येईल अशी आशा आहे तर शेतकरी कापसाच्या नुकसानीतून सावरत पुन्हा उभे राहत असल्याचे चित्र सध्या दिसत आहेत तर आज घडीला शेतकऱ्यांना मागील संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांस तात्काळ विमा देवून शेतकऱ्यांना जीवदान द्या अशी आशा शेतकरी व्यक्त करताना दिसत आहेत

### महामानवास शांती पदयात्रेतून मानवंदना




**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'जयभीम नगर बुद्ध वेलफेअर असोसिएशन'तर्फे जयभीम नगर बुद्ध विहार, हिरानंदानी पवई येथे ७ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत एका भव्य सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक बौद्ध धम्मगुरू पू. भिक्खु विशुद्धानंदबोधी महास्थवीर कार्यक्रमाचे अध्यक्ष असणार आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, गोवा, दिल्ली येथून तसेच देशा-विदेशांतून ६०० हून अधिक भन्तेजी आणि उपासक-उपासिका उपस्थित राहणार आहेत. भोजनदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पुण्यदान व सत्कार, धम्मदेशन व परित्राण, भव्य धम्मरॅली, पूज्य भन्तेजींकडून भव्य धम्मदेसन व विशेष मार्गदर्शन मिळेल. असे बौद्ध उपासक व पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांनी सांगितले.

### उच्चाकीं भाव दिल्याबद्दल चेअरमन पृथ्वीराज जाचक यांचे सभासदाकडून पेढे भरवून कौतुक



**दैनिक युवक आधार**

**सणसर (विकास क्षत्रिय) :** इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती सह साखर कारखान्याची सोमवारी संचालक मंडळाची बैठक पार पडली व त्यामध्ये शेतकऱ्यांना कारखान्यामार्फत उसाची पहिली उचल म्हणून 3101 रुपये जाहीर करण्यात आली. मागील काळात एवढा उच्चाकीं दर आजपर्यंत कोणत्याच संचालक मंडळाने दिला नसल्यामुळे आणि आताच कुठं नवीन संचालक मंडळ आपला कारभार काटकसरीने करून शेतकऱ्यांना योग्य भाव देण्यासाठी प्रयत्नशील असल्यामुळे ढेकळवाडी गावातील युवा शेतकऱ्यांना चेअरमन मा.पृथ्वीराज बापू जाचक व सर्व संचालक मंडळाचा अभिमान वाटत असल्यामुळे शेतकरी धनराज सुधीर घुले व भूषण टकले सर यांनी समस्त ग्रामस्थ ढेकळवाडीच्या वतीने चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक व संचालक शिवाजीराव निंबाळकर यांना पेढा भरवून उच्चाकीं भाव दिल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

### मालमत्ता भाडे प्रकरणी फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मालमत्ता भाड्याने देताना किंवा हेवी डिपॉझिट व्यवहार करताना नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

उलवा पोलीस ठाण्यात एका घरभाडे व्यवहारात चार लाख रुपयांच्या हेवी डिपॉझिट घेऊन फसवणूक केल्याची तक्रार दाखल झाली आहे. या प्रकरणात तक्रारदार किर्ती नायडू यांनी मुशीर खान आणि आलिया मुशीर खान यांच्याविरोधात अर्ज दाखल केला असून, पोलीसांनी दोघांना चौकशीसाठी हजर राहण्याचे समजपत्र बजावले आहे.

# कोकण विकासाचे दूरदृष्टीमान शिल्पकार बॅ. ए. आर. अंतुले – स्मृतिदिनी म्हसळ्यात कृतज्ञतेची अभिवादनांजली

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा तालुका प्रतिनिधी/ शिरीष समेळ :** म्हसळा येथील वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय आणि बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी केंद्रीय आरोग्य मंत्री ,महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांचा स्मृतिदिन गौरवपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विश्वस्त मंडळाचे प्रतिनिधी आणि स्थानिक विकास समितीचे अध्यक्ष फझल हलडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बँक ऑफ इंडिया शाखा म्हसळा मॅनेजर फय्याज शेख, मुस्लिम समाजाचे अध्यक्ष अहमद अली पेनकर, डॉ. मुबशीर जमादार, आसिफ चोगले, शकुर घनसार, निजाम कागदी, शब्बीर



काजी, शब्बीर फकीर, बनोटी गावचे सरपंच देवजी गाणेकर, ग्रामस्थ कृष्णा गाणेकर, नीलकंठ गाणेकर, निलेश जंगम, अनिल टिंगरे, शाहिद उकये, शहानवाज उकये, फारूक बेरेकर, दोंदीलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**अतिथींच्या भाषणातून अंतुले यांच्या कार्याचा गौरव**

कार्यक्रमात डॉ. मुबशीर जमादार, फय्याज शेख यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थीनी मल्लिका सिंग आणि आयेशा कौचाली यांनी बॅ. अंतुले यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांचे योगदान विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले. त्यांनी अंतुले यांच्या लोकाभिमुख धोरणांची आठवण करून दिली.

**"कोकणाच्या विकासासाठी अंतुले यांची दूरदृष्टी अद्वितीय" – फझल हलडे**

अध्यक्षीय मनोगतात बोलताना फझल हलडे म्हणाले, "बॅरिस्टर अंतुले हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांची उंची गाठणारे नेतृत्व अजून जन्माला यायचे आहे." कोकणाच्या विकासात अंतुले यांनी राबवलेल्या योजनांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले— दिघी आंतरराष्ट्रीय बंदर प्रकल्प,लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,दापोली कृषी विद्यापीठ,कोकणातील रस्ते, महामार्ग, दळणवळणाची साधने,समग्र विकासासाठी मंजूर विविध योजना आज या सर्व योजनांची प्रत्यक्षात फलश्रुती दिसत असल्याचे त्यांनी नमूद केले. फझल हलडे पुढे म्हणाले की, "गरीब हाच विकासाचा केंद्रबिंदू" या तत्वावर अंतुले यांनी काम केले. खेड्यापाड्यातील गोरगरीब मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी वसंतराव नाईक यांच्या नावाने महाविद्यालये सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक दालने खुली केली.

कार्यक्रमाचे आयोजन सुबक व शिस्तबद्ध आयोजन करण्यात प्रा.शिरीष समेळ, डॉ.सिद्दीकी, डॉ.सुरेश दुंडे ,डॉ. तुषार उमासरे,प्रा.मयुर बढे,प्रा.राजेंद्र हलोर प्रा.सलमा नजिरी,प्रा.अतिका नजिरी,प्रा. कांचन पवार,प्रा.सॉलिया मुकादम,प्रा. सोनाली तांबे,प्रा,उमैमा दफेदार,प्रा. बंदरकर, कार्यालयीन अधीक्षक श्री. महेंद्र करडे, श्री.सुभाष साळवे, श्री. वावेकर,श्री.शिंदे,श्री.बुधकर यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भोसले यांनी समर्थपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन प्रा. बेंद्रे यांनी केले.कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्राथमिक शाळा बनोटी, प्राथमिक शाळा रेवली आणि प्राथमिक शाळा म्हसळा आदिवासी वाडी येथील विद्यार्थ्यांना फळ वाटप करण्यात आले या सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून बॅ. ए. आर. अंतुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांची दूरदृष्टी आणि विकासदृष्टीचा जनतेसमोर पुन्हा एकदा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. महाविद्यालय परिसरात दिनविशेषानिमित्त उत्साहाचे आणि कृतज्ञतेचे वातावरण पसरले होते.

## सिंदफणा साहित्य संमेलनात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी :** शिरूर कासार येथे होत असलेल्या सातव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेला असून वर्ग पाचवी ते आठवी आणि नववी ते बारावी या दोन गटांमध्ये प्रथम बक्षीस देण्याचे नियोजित केले आहे. बीड जिल्हास्तर ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे १) मराठी साहित्याची परंपरा संस्कृतीचा आत्मा २) कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षणाची नवी क्रांती की आव्हान ३) महापुरुषांच्या स्वप्नातील भारत साकारण्यासाठी माझी भूमिका ४) स्वच्छ भारत ते स्वच्छ मन युवकांची भूमिका ५) हवामान बदल आणि आपली जबाबदारी या विषयावर स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी असून एका विषयावर पाच मिनिटांचा भाषण व्हिडिओ तयार करून पाठवा. व्हिडिओ पाठवण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर असेल यानंतर प्राप्त व्हिडिओ ग्राह्य धरले जाणार नाहीत. मो.नं ९४२१६२८६३७, ९८८१००४४२२ या व्हाट्सअप वर पाठवावा. अधिकाधिक स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## ४४ लाखांचा फोर्टीफाईड तांदूळ जप्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** फोर्टीफाईड तांदळाची खुल्या बाजारात विनापरवाना विक्री करताना मिळून आल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दोन डिसेंबर गुन्हा दाखल करण्यात आला.

वेस्टर्न राईस मिल माणगाव कोल्हापूर, पिके मलगी ॲग्रोटेक लिमिटेड कर्नाटक, श्री बंशाकरी ॲग्रो प्रोसेसिंग लिमिटेड या कंपनीच्या मार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत असलेल्या फोर्टीफाईड तांदळाची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर आष्टे लॉजिस्टिक कसळखंड या समोरील ट्रक पार्किंगमध्ये पुरवठा विभाग आणि पनवेल तालुका पोलीस यांच्याकडून एक डिसेंबर रोजी कारवाई करण्यात आली. यावेळी पाच वाहनांमध्ये 44 लाख 21 हजार 416 रुपयांचा 1 हजार 600 क्विंटल तांदूळ (25 किलो बॅग प्रमाणे सहा हजार चारशे बॅग) सापडून आला. 44 लाखांचा तांदूळ आणि 70 लाखांच्या पाच गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## ७ डिसेंबर रोजी "खासदार क्रीडा महोत्सव-२०२५" अंतर्गत भव्य मॅरेथॉन स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मुंबईकरांना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे जनतेला विविध खेळ प्रकारांबरोबरच मॅरेथॉनच्या माध्यमातून देशाचे उज्ज्वल भवितव्य असलेल्या युवापीढी व जनतेला निरोगी तसेच सुदृढ समाजाची जडण घडण करण्याच्या उद्देशाने २७ मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रवींद्र वायकर यांनी ७ डिसेंबर रोजी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार लोकसभा क्षेत्रात "खासदार क्रीडा महोत्सव-२०२५" चे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाचा भाग म्हणून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि मॅरेथॉन स्पर्धा २ किलो मीटर, ५ किलो मीटर व १० किलो मीटर अशी पार पडणार असून आरे चेक नाका, गोरेगाव (पूर्व) येथून स्पर्धेला सकाळी ६ वाजता सुरुवात होणार आहे. आरे चेक नाका-बिरसा मुंडा चौक-आरे चेक नाका असा स्पर्धेचा मार्ग असणार आहे.

## माझी आजी



किती लिहिले तरी कमीच आहे. ती फक्त आजी नाही तर कोणाची माऊली तर कोणाची सासू, कोणाची आई तर कोणाची बाई, कोणाची काकी तर कोणाची मावशी. आजी हा शब्द साधासुधा नाही तर तो प्रेम आणि मायेनं भरलेला शब्द आहे. तिला कसलाच लोभ व गर्व मोठेपणा नव्हता तिची खूप इच्छा होती राहायची तरी पण तिने कधीच तक्रार केली नाही की मला दुसरी खोली हवी आहे. घरी आलेले पाहुणे कधीही रिकामी हाती किंवा रिकाम्या पोटी गेले नाहीत. तिला दोन मुलगे, दोन मुली आणि आजोबा. पण आजोबा ६० व्या वर्षी देवाघरी गेले. अंतर आजी एकटी असली तरी सुध्दा तिने पूर्ण विश्वास नाही तर प्रेम त्यांच्या मुलांना दिलंय पण, आज दिनांक २९-११-२०२५ रोजी ९ वाजता राहत्या घरी, आई, माई, आजी काकी यांच्या दुःखद निधन झालं. पण तिने कर्म बघा ना देऊन तिचा मृत्यू देव दिवाळी या पवित्र दिवसां केला. असे बोलले जातात की जो ह्या दिवशी मरतो त्याच्या आत्म्यास लवकर मोक्ष मिळतो. पण आज तु देवाघरी गेली तरी पण तुजी राठगी आणि स्तुती करात पहून मला खूप आनंद झाल. देव! आजीला शांती द्या.

**.......तनिश तानाजी गुडेकर**
**श्रद्धांजली अर्पण**
**सौ. भक्ती राजेंद्र मळेवाडकर**

## संविधान दिन निमित्त सविंधान पदयात्रा,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख :** नागपूर तर्फे संविधान चौक येथे शहरातील इतर सात संघटनाच्या संयुक्तविद्यमाने संविधान दिन निमित्त २६ नोव्हेंबर २०२५ रोजी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर जिल्हा, संविधान जागर अभियान, विदर्भ मोलकरीण संघटना, अंगणवाडी कर्मचारी सभा, योगा स्मारक अभियान, साऊ एकल महिला संघटना व बोधिसत्व महिला बहुउद्देशीय संस्था चे कार्यकर्ते यांनी संविधानाचे शिल्पकार प.पू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संविधान पदयात्रेचा आरंभ झाला. ही पदयात्रा जुना मॉरीस कालेज, झिरो माईल्स, शाहिद गोवारी चौक व विधानसभा चौक मार्गे परत संविधान चौकात आली. त्यानंतर रॅलीचे सभेत रुपांतर झाले. त्यानंतर सादर केलेल्या "जागरुकता संविधान की"या पथनाट्याला प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. यावेळी प्रत्येक संघटनेचे वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. संविधान गीते पथनाट्ये, सामुहिक गीते सादर करण्यात आले. संविधान जागर अभियाना तर्फे पी डब्लू एस कॉलेज विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. या प्रसंगी महा. अंनिसच्या वतीने 'जागरुकता संविधान की' या हिंदी नाटकाचा 86 वा प्रयोग सादर करण्यात आला व प्रेक्षकांनी पथनाट्याला भरभरुन प्रतिसाद दिला.

त्यानंतर या कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यात रॉकी घुटके, माधुरी मेश्राम, गायक अजय रहाटे, कमलाकर सतदेवे, प्रा. माणिक लोणारे, स्वेता गजभिये, शुभम आवळे, चंदा मोटघरे व प्रज्ञा डोंगरे यांचा समावेश आहे, विशेष म्हणजे मागील पाच वर्षांपासून या नाटकाचे प्रयोग




सातत्याने शहरी व ग्रामीण परिसरात होत आहेत. संविधान रॅलीचे संपूर्ण नियोजन चित्तरंजन चौरे, देवानंद बडगे, गौतम पाटील, प्रा. डॉ. सुनील भगत, देवयानी भगत, प्रा. पुष्पा घोडके, मंगला गाणार, इंदू उमरे, सुषमा शेवडे, व शारदा मोटघरे, इंदू उमरे, ॲड. मोनाली, प्रा. स्वप्नील फुसे, जितेंद्र वेळेकर, सुजाता भोंगाडे, माया ढाकणे, सुधा जनबंधू, यांनी केले.

संविधान उद्घोषणा गौतम पाटील, प्रा. डॉ. सुनील भगत, देवयानी भगत, प्रा. पुष्पा घोडके, मंगला गाणार, इंदू उमरे, सुषमा शेवडे,वनिता, ज्योती, मीना व टीम तर जयघोष मनिषा, अमीता, माया यांनी घोषणा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन चित्तरंजन चौरे यांनी तर आभारप्रदर्शन उज्वला नारनवरे यांनी मानले. कार्यक्रमाला वरील सर्व संघटनेचे अंदाजे २०० च्या वर सदस्य उपस्थित होते.

## श्रीवर्धन नगरपरिषद निवडणूक २०२५ : राष्ट्रवादी–भाजप युतीची भव्य रॅली शहरात शक्तीप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि भारतीय जनता पक्षाच्या युतीतर्फे भव्य आणि उत्साहवर्धक प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले. १ डिसेंबर २०२५ रोजी काढण्यात आलेल्या या रॅलीत शहर व



तालुक्यातील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीचा मार्ग सोमजाई मंदिरापासून सुरू होत छत्रपती शिवाजी महाराज चौक, गणपती मंदिर परिसर असा पार पडला. ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी घोषणा, झेंडे, ढोल-ताशांच्या गजरात रॅलीचे स्वागत करून परिसर दणाणून सोडला. संपूर्ण शहरात निवडणुकीचे वातावरण अधिक रंगतदार झाले. ही रॅली आमदार आदितीताई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच स्थानिक नेतेमंडळींच्या नेतृत्वात शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. उमेदवारांना मिळालेल्या उत्स्फूर्त जनसमर्थनामुळे युतीच्या विजयाबाबत कार्यकर्त्यांमध्ये मोठी आशावादी भावना निर्माण झाली आहे. रॅलीच्या निमित्ताने शहरात झालेल्या प्रचंड गर्दीमुळे निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला असून, आगामी मतदानात युती कोणता लोकत्साह आणणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# बांगलादेशी बोगस तृतीय पंथीयांचा मुंबईत मनमानी कारभार

## सरकारने पोलिसांना कारवाई करण्याचे आदेश द्यावेत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : मुंबई शहर व उपनगरात बांगलादेशातून आलेल्या बोगस तृतीयपंथीयांचा मनमानी कारभार सुरू असून पोलिस बघ्याची भूमिका घेत आहेत. या बोगस बांगलादेशी तृतीयपंथीयांच्या टोळ्या मुंबईत ठिकठिकाणी वास्तव्य करीत असून रेल्वेमध्ये भीक व इतर अश्लील गैरप्रकार सुरू आहेत. या सर्व प्रकारातून लाखो रुपयांची उलाढाल होत असून हे संकट भयंकर रूप धारण करत आहे. यावर त्वरित आळा घालण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते कृष्णा आडेरकर यांनी राज्य सरकारकडे केली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत त्यांनी दिली.

काही समाजघातक व्यक्तींनी त्यांना मुंबईत आश्रय दिला आहे. हे बोगस तृतीयपंथी मुंबई नगरीत गैर मार्गाने मोठ्या प्रमाणात पैसे उकळत असून खऱ्या तृतीयपंथीयांना मारहाण करणे, धमकावणे असे प्रकार करत आहेत. रेल्वेमध्येही या बांगलादेशी तृतीयपंथीयांनी घुसखोरी केली असून रेल्वे सुरक्षा यंत्रणांचे यावर कोणतेही नियंत्रण नाही असे कृष्णा आडेरकर यांनी सांगितले.

बांगलादेशी तृतीयपंथी देहविक्रीचा व्यवसाय खुले आम करीत असल्याने जनतेवर वाईट परिणाम होत आहेत. ट्रेनमध्ये महिला डब्यात घुसून जबरदस्तीने पैसे उकळण्याचे प्रकार घडत आहेत. प्रवासी महिलांसोबत काही गैरकृत्य झाले तर यास जबाबदार कोण ? असा सवाल कृष्णा आडेरकर यांनी केला आहे. प्रत्येक रेल्वे स्टेशनवर हे बांगलादेशी बोगस तरुण तृतीयपंथींची वेशभूषा करून किन्नर बनून वावरत असतात. महिलांच्या डब्यात घुसून त्यांच्याशी अश्लील कृत्य करतात. गर्दीचा फायदा घेत गळ्यातील दागिने, पर्समधील पैसे, मोबाईल चोरणे असे कृत हे बांगलादेशी पुरुष तृतीयपंथी करीत आहेत.

असे प्रकार करून घरी जाण्याची वेळ झाली की आसपासच्या शौचालयात कपडे बदलून पुन्हा पुरुषांच्या आहे त्या वेषात घरी जातात. त्यांना मुंबईत आश्रय देण्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी कृष्णा आडेरकर यांनी सरकारकडे पत्राद्वारे केली आहे.

# राजापूर तालुक्यातील बागवेवाडी येथील बीएसएनएल टॉवर अखेर जनतेसाठी खुला

**दैनिक युवक आधार**

**राजापूर:-(प्रमोद तरळ) :** तालुक्यातील मौजे बागवेवाडी येथील बीएसएनएल (BSNL) टॉवर अखेर ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिकांसाठी सुरू झाला असून आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कित्येक वर्षापासून नेटवर्कसाठी वंचित असलेल्या बागवेवाडीने बीएसएनएल टॉवरच्या रूपाने विकासाचे अजून एक पाऊल टाकले आहे. विद्यमान आमदार मा.श्री.किरणजी सामंत आणि जिल्हाधिकारी मा.श्री.देवेंदरजी सिंह यांनी तालुक्यातील मोबाईल नेटवर्क तातडीने करावे असे अधिकाऱ्यांना सांगितले .गावातील ग्रामस्थ बालमित्र मंडळाचे अध्यक्ष श्री



कमलेश गांगण यांनी लगेचच माहिती घेत मा.श्री.किरण सामंत तसेच जिल्हाधिकारी रत्नागिरी , राजापूर यांच्याकडे धाव घेतली आणि कामाचा पाठपुरवठा करत तातडीने सर्वे करण्यास सांगितला. सरपंच कु.नीलमताई हातणकर यांनी लागणारी कागदपत्रे वेळोवेळी राजापूर कार्यालयामध्ये सुपूर्द केली आणि स्थानिक ग्रामस्थांशी संपर्क साधला. सदर सर्व प्रक्रियेमध्ये श्री प्रशांत कुलकर्णी बीएसएनएल अधिकारी, सौ.अदिती नार्वेकर मॅडम (भू कर मापक अधिकारी), श्री रसाळ सर (बीएसएनएल अधिकारी रत्ना. डिव्हिजन ), श्री शिरसाट सर (रत्ना. डिव्हिजन), बागवेवाडी उत्कर्ष मंडळ मुंबई व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले . मुंबईस्थित आणि गावातील सर्व ग्रामस्थ उपसरपंच श्री शिवरामजी कामतेकर, मुंबई मंडळ अध्यक्ष श्री संतोष शेट्ये , सचिव श्री विजय पांचाळ, श्री दशरथ कामतेकर, ग्रा. सदस्य सौ.तनुजा बावकर,मा. तंटामुक्ती अध्यक्ष श्री संजय रोडे ,श्री योगेश हातणकर, श्री संतोष कामतेकर ,श्री संभाजी कुळये,माजी ग्रा.पं.सदस्य श्री.अनंत बावकर, श्री राजेंद्र आगटे ,श्री महेश पांचाळ ,श्री मनोज पांचाळ ,श्री प्रमोद आगटे , श्री मकरंद गांगण , श्री वासुदेव चौगुले,श्री अशोक शेट्ये, श्री चंद्रकांत बावकर, श्री अनंत कामतेकर आदी सर्वांचे सहकार्य लाभले .

सर्वेसाठी लगतचे जमीन मालक श्री रोहन मसुरकर , श्री संतोष आगटे, श्री प्रवीण कामतेकर यांनी सुद्धा मोलाचं योगदान दिले.

आमदार श्री किरणजी सामंत तसेच सर्व अधिकारी वर्ग, मुंबईस्थित आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या सहकार्याबद्दल यावेळी आभार मानण्यात आले

# भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी 'टूर सर्कीट'चे आयोजन ; अनुयायांनी लाभ घेण्याचे मंत्री शंभूराज देसाईंचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :**"भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास आणि त्यांचे विचार ही केवळ इतिहासाची पाने नसून ती भावी पिढीसाठी प्रेरणास्रोत आहेत. महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून पर्यटन संचालनालयाने आयोजित केलेले 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट' हा एक स्तुत्य उपक्रम असून, हा केवळ पर्यटन प्रवास नसून समता आणि बंधुतेच्या विचारांची अनुभूती देणारी वैचारिक यात्रा आहे," असे प्रतिपादन राज्याचे उत्पादन शुल्क व पर्यटन मंत्री ना. शंभूराज देसाई यांनी केले.

पर्यटन संचालनालयामार्फत दि. ३ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुंबईत या विशेष टूर सर्कीटचे आयोजन करण्यात आले आहे. याविषयी माहिती देताना ना. शंभूराज देसाई म्हणाले की, "डॉ. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली स्थळे, त्यांचे निवासस्थान आणि कर्मभूमी पाहण्याची संधी अनुयायांना आणि पर्यटकांना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे."

**टूर सर्कीटचा मार्ग आणि प्रमुख स्थळे:**

या विशेष सहलीमध्ये दादर येथील चैत्यभूमी, हिंदू कॉलनीतील 'राजगृह' (निवासस्थान), वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स व कॉमर्स महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, परळ येथील ऐतिहासिक बीआयटी चाळ आणि फोर्ट येथील सिद्धार्थ महाविद्यालय या महत्त्वपूर्ण स्थळांचा समावेश आहे.

**पर्यकांसाठी मोफत सुविधा:**

पर्यटन विभागातर्फे दररोज ३ बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून, पर्यटकांना 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. विशेष म्हणजे हा प्रवास पूर्णतः निःशुल्क (मोफत) असून, पर्यटकांना माहिती देण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक (Guide) आणि अल्पोपहाराची सोय देखील शासनाकडून करण्यात आली आहे.या टूर सर्कीटचा शुभारंभ ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता वीर सावरकर राष्ट्रीय स्मारक समोर, शिवाजी पार्क, दादर येथून होणार आहे. तरी डॉ. बाबासाहेबांचे विचार समजून घेण्यासाठी आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी जास्तीत जास्त अनुयायांनी व पर्यटकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

# बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण मुंबई उच्च न्यायालय करावे ; नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात ठराव मांडावा : आमदार सुनील प्रभू यांची पत्राद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी ) :** बॉम्बे हायकोर्ट चे नामांतरण करून मुंबई उच्च न्यायालय असे करावे यासाठी दिंडोशीचे शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी राज्य सरकारला पत्राद्वारे येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात प्रस्ताव संमत करून केंद्र सरकारला पाठवावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांना केली आहे.

सध्या राज्यात बॉम्बे हायकोर्ट चे मुंबई उच्च न्यायालय करण्याबाबतचे विषय ऐरणीवर असून गेले



वीस वर्षापासून केंद्र सरकारशी अनेक आमदार व खासदारांनी पाठपुरावा करून देखील यावर कोणतीही कारवाई न करता हा प्रश्न प्रलंबित असल्याचे शिवसेनेचे दिंडोशीतील आमदार सुनील प्रभू यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांचे लक्ष वेधत याबाबत केंद्र सरकारने लेटेस्ट पेटंट ऑफ हायकोर्ट १८६२ यानुसार सुधारणा करावी अशा सूचना देत पुढे म्हटले आहे की याबाबत आपण कोणतीही कार्यवाही केली नसल्याची बाब समोर आली असून सरकारने एक सरकारने

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन महाराष्ट्रातील मराठी जनतेची अनेक वर्षापासूनची मागणी पूर्ण केली. यासाठी देखील मराठी भाषिक जनता व मराठी साहित्यिकानी संघर्ष करीत लढा दिला व या मागणीसाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपूरावा करावा लागला.

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला अशा अनेक प्रस्ताव या विधान सभेत मांडत त्याची अंमलबजावणी झाली असल्याची प्रथा परंपरा विधानसभेत पाळल्या गेल्या आहेत त्याचप्रमाणे बॉम्बे हायकोर्ट चे मुंबई उच्च न्यायालय हे नामांतर करावे यासाठी, ८ डिसेंबर रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभेत त विशेष शासकीय ठराव मारण्यात यावा व यास सर्वानुमते मंजूरी देऊन हा ठराव केंद्र सरकारकडे तातडीने मंजूर करण्यासाठी कार्यवाहीसाठी पाठवण्यात यावा अशी मागणी आमदार सुनील प्रभू यांनी पत्राद्वारे केली आहे

# निफाड तालुक्यातील भरवस फाट्याजवळ बिबट्या मृतावस्थेत आढळला

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी : राजेश भडांगे :** नाशिक– छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील भरवस फाटा जवळील गणेश मंगल कार्यालयाजवळ चंद्रकांत जाधव यांच्या शेतात आज संध्याकाळी एक बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. अचानक घडलेल्या या घटनेने परिसरात घबराट निर्माण झाली.

घटनेची माहिती पोलिस पाटील विलास चौधरी यांनी मिळताच त्यांनी तत्काळ वनविभागाशी संपर्क साधला. सूचना मिळताच वनरक्षक विंचूर विजय दोंदे, माजी सैनिक



अंकुश गुंड, आधुनिक बचाव पथक निफाडचे सागर दुसिंग, भारत माळी, विजय माळी, सादिक शेख, वैभव दौंड, शरद चांदोरे, मयुर गांगुर्डे, समाधान चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याचा ताबा घेतला. वनविभागाच्या प्राथमिक तपासानुसार, सदर बिबट्याचा मृत्यू दोन ते तीन दिवसांपूर्वी झाला असावा. शव विघटन झाल्याचे व किडे लागल्याचेही स्पष्ट दिसून आले. नैसर्गिक मृत्यू किंवा दोन बिबट्यांमध्ये झालेल्या संघर्षातून मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

“शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे नेमके कारण कळू शकेल,” असे वनपाल विजय दोंदे यांनी सांगितले.भरवस फाटा परिसरात अलिकडे बिबट्यांच्या हालचाली वाढल्याचे समोर येत असून, वनविभागाने गावकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# डॉक्टर मनाली क्षिरसागरनागपूर विद्यापीठाला 'मीरा' भेटली! डॉ. मनाली क्षीरसागर (पूर्वाश्रमीच्या मीरा बैतुले) कुलगुरुपदी!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

**नागपूर:** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या (RTMNU) कुलगुरुपदी नुकतीच डॉ. सौ. मनाली क्षीरसागर यांची नियुक्ती जाहीर झाली आणि संपूर्ण विदर्भभरात आनंदाची लहर पसरली. मात्र, नागपूरच्या रेशीमबाग परिसरातील श्री. अनंत बैतुले आणि त्यांच्या मित्रपरिवारासाठी ही बातमी खास अभिमानाची ठरली आहे. कारण, डॉ. क्षीरसागर, ज्यांचे पूर्वाश्रमीचे नाव मीरा बैतुले आहे, त्या अनंत बैतुले यांच्या भगिनी आहेत!

रेशीमबागेतील एका एकत्रित कुटुंबातून आलेल्या मीरा बैतुले (डॉ. मनाली क्षीरसागर) आणि त्यांचे चुलत



भाऊ आणि समवयीन असणारे अनंत बैतुले यांचे महाविद्यालयीन शिक्षणही एकत्रच झाले. या भावा-बहिणीचे घट्ट नाते आणि एकत्रित कुटुंबातील संस्कार त्यांच्या यशात महत्त्वाचे ठरले आहेत.

**मित्राची बहीण, आता विद्यापीठाची 'कुलगुरू'!**

अनंत बैतुले यांच्या मित्रपरिवारासाठी ही निवड म्हणजे केवळ आनंद नाही, तर मोठा अभिमान आहे. त्यांच्या वर्तुळात अनेक वर्षे 'अनंतची बहीण मीरा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने आज राज्याच्या एका महत्त्वाच्या विद्यापीठाचे सर्वोच्च पद भूषवावे, ही त्यांच्या मैत्रीची आणि समाजातील योगदानाची पावतीच आहे.

"आमच्या मित्राची बहीण आज कुलगुरू झाली आहे. लहानपणापासून आम्ही तिला पाहिले आहे आणि तिचे हे यश आमच्या संपूर्ण मित्रपरिवारासाठी खूप प्रेरणादायक आहे. अनंता, तुझे मनापासून अभिनंदन!"

डॉ. मनाली क्षीरसागर (मीरा बैतुले) यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या कारभारात नवीन ऊर्जा आणि विचारांची दिशा मिळेल, अशी अपेक्षा शिक्षण क्षेत्राकडून व्यक्त होत आहे. रेशीमबाग आणि बैतुले परिवार यांच्यासह संपूर्ण मित्रपरिवाराने डॉ. क्षीरसागर यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.सर्व मित्रपरिवाराकडून अनंत आणि डॉ. सौ. मनाली क्षीरसागर यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**अखेर मिळाले नागपूर विद्यापीठाला कुलगुरू**

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर राज्यपालांनी आज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरूपदीडॉक्टर मनाली क्षिरसागर

यांची नियुक्ती केली माननीय कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन हार्दिक शुभेच्छा त्यांच्या कार्यकाळात नागपूर विद्यापीठाला काही निश्चितच नवनवे नियोजन बघावयास मिळेल.

# नवी मुंबईत झालेल्या इप्सिता स्किल एज लॉजिस्टिक्स पॉवर कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : नवी मुंबईतील वाशी येथे आयोजित इप्सिता स्किल एजची आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक्स पॉवर कार्यशाळा संपन्न झाली. लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अनुभवी मार्गदर्शक, एचआर व आयटी विभागांचे प्रमुख, सीएफएस व शिपिंग क्षेत्रातील तज्ज्ञ, निर्यात–आयात विषयातील जाणकार, शिक्षणक्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अदाणी -एनएमआयए, सविता ऑईल, ग्लोबिकॉन, पीएसए सिंगापूर बंदर, यशस्वी स्किल अकॅडमी , अर्कास लाईन आणि महाराष्ट्र दिनमान या संस्थांच्या प्रतिनिधींनी इप्सिताच्या उद्योगाशी जोडलेल्या प्रशिक्षण पद्धतीचे कौतुक करत भविष्यातील




लॉजिस्टिक्स क्षेत्रात अशा प्रशिक्षणाची मोठी गरज असल्याचे नमूद केले. या कार्यशाळेचे विलास पांधे यांचे प्रभावी प्रशिक्षण सत्र प्रमुख आकर्षण होते. 30+ वर्षांचा विशाल अनुभव आणि इंटरनॅशनल लॉजिस्टिक्स: सोप्या भाषेत या पुस्तकाचे लेखक म्हणून, त्यांनी संपूर्ण आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक्सचे तत्त्वज्ञान—खरी उदाहरणे, व्यवहारातील प्रकरणे आणि प्रत्यक्ष वापरातील कागदपत्रे दाखवत अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितले. यानंतर हरीशचंद्र वयाळ, सीमाशुल्क व व्यापार नियम मार्गदर्शन यांनी घेतलेल्या सत्रातून सीमाशुल्क प्रक्रिया, निर्यात–आयात धोरणे आणि निघणाऱ्या निर्णयांच्या डिजिटल पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना व व्यावसायिकांना अत्यंत स्पष्ट दिशा मिळाली. विविध जहाज वाहतूक कंपन्या, मालवाहू अग्रेषक, कस्टम एजंट, वाहतूकदार, गोदाम व्यवस्थापक आणि Bharati Vidyapeeth IM&IT, Indira Institute, Geeta Institute येथील मोठ्या विद्यार्थीगटांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम उल्लेखनीय ठरला.

या कार्यशाळेच्या नियोजनासाठी EEPSITAA टीमचे शैक्षणिक प्रमुख , मानवसंसाधन–प्रसार–व्यवसाय विकास प्रमुख समीर शेख, प्रशासन व नोकरीसंदर्भ सेवा प्रमुख भारती जयंत यांनी प्रयत्न केले.

# नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचा रडीचा डाव ; बुलढाण्यात सत्ताधारी पक्षाकडून बोगस मतदान, कठोर कारवाई करा : हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा / प्रतिनिधी :** नगरपालिका निवडणुकीच्या मतदानात सत्ताधारी भाजपा महायुती रडीचा डाव खेळत आहे. निवडणुका निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्यच आहे पण बुलढाण्यासह राज्याच्या विविध भागात तरी तसे होताना दिसत नाही. ग्रामीण भागातून गाड्यांमध्ये भरून लोकांना बुलढाण्यात आणून बोगस मतदान केले पण पोलीस व प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतली. बोगस मतदान करणारे व त्यांना तसे करावयास लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

नगरपालिकेच्या मतदानावेळी राज्यात अनेक ठिकाणी गैरप्रकार पाहण्यास मिळाले. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बुलढाण्यात ग्रामीण भागातून गाड्या भरून बोगस मतदार आणण्यात आले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बोगस मतदार पकडल्यानंतर स्थानिक आमदाराच्या लोकांनी पोलिसांशी हुज्जत घातली आणि पोलिसही किरकोळ कारवाई करतो असे सांगतात, ही लोकशाहीची थट्टा आहे. सत्ताधारी किती भ्रष्ट आहेत व गुंडगिरी करतात हे त्यांनी आज पुन्हा दाखवून दिले. काँग्रेसला वातावरण पोषक आहे पण सत्ताधारी भाजपा महायुती रडीचा डाव खेळत आहे. सत्ताधाऱ्यांनी काहीही केले तरी काँग्रेसचा विजय होणार असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

बुलढाणा नगरपालिका निवडणुकीसाठी सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आणि केवळ दीड तास उलटत नाही तोच बोगस मतदान करण्यासाठी सुरूवात झाली. प्रभाग क्रमांक १५ साठी गांधी प्राथमिक शाळा येथे मतदान केंद्र आहे. येथे असलेल्या वैभव देशमुख नामक व्यक्तीच्या नावावर कोथळी तालुका मोताळा येथील एकाला बोगस मतदान केल्यानंतर पकडले. त्याच्यासोबत आणखी एकजण होता. कोथळी, इब्राहिमपूर येथून अनेक लोक बोगस मतदान करण्यासाठी आणण्यात आले. घाटाखालून गाड्या भरून बुलढाण्यामध्ये बोगस मतदार आणले होते, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

## “देह माझे भजन, तर शास्त्रीय संगीत माझा आत्मा”- पं. उमेश चौधरी दत्तजयंतीनिमित्त भक्तिभावे उत्सव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दत्तजयंतीनिमित्त आयोजित भक्तिमय कार्यक्रमात प्रसिद्ध संगीतकार व गायक पं. उमेश चौधरी यांनी आपल्या सुमधूर गायनाने उपस्थितांचे मन मोहून टाकले. या प्रसंगी बोलताना त्यांनी, “देह माझे भजन, तर शास्त्रीय संगीत माझा आत्मा” असे मनोवेधक प्रतिपादन केले.

सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजे मजकूर योगीनगर (धोंडळी) परिसरात दरवर्षीप्रमाणे भक्तिभाव आणि अध्यात्मिक उत्साहात ‘श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव’ आयोजित करण्यात आला. श्री नवनाथ सेवा मंडळ, योगीनगर (धोंडळी) यांच्या वतीने आयोजित हा उत्सव स्थानिक भक्तांसह संपूर्ण परिसरातील भाविकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण मानला जातो.मुख्य आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी सादर झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच प्रांगणात भक्तीभाव आणि संगीतरसिकांच्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पं. उमेश चौधरी यांनी विविध रचना सादर करत रसिकांना अद्वितीय संगीत अनुभव दिला.

त्यांच्या सुमधुर गायनाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दत्तजयंतीच्या शुभवेलीत आयोजिलेला हा कार्यक्रम आध्यात्मिक उन्नती आणि संगीतसाधनेचा सुंदर संगम ठरला. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला महंत यशवंत महाराज यांची आशिर्वादपर प्रमुख उपस्थिती लाभली.




तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनीही उपस्थिती दर्शविली.

पं. उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाला अक्षय चौधरी आणि मंगेश चौधरी यांनी संगीत साथ दिली. तबल्यावर सुप्रसिद्ध तबलावादक प्रसाद पाध्ये, पखवाजावर ॲड. सूरज गोंधळी, हार्मोनियमवर सुप्रिया जोशी तर टाळ वाद्यावर गुरुदास कदम या अनुभवी कलाकारांची उत्तम साथ लाभली. सूत्रसंचालन व निवेदनाची जबाबदारी सोपान आडव यांनी प्रभावीपणे पार पाडली. पं. उमेश चौधरी यांनी गायनाची सुरुवात जयजयंवती रागातील बडा खयाल ‘ए माई ऐसे समेमे’ ने केली. त्यानंतर त्याच रागातील ‘मोरे मंदर अजहूनही आये’ हा छोटा खयाल सादर केला. पुढे ‘श्रीरामचंद्र कृपाळू भजु मन’ ही गोस्वामी तुलसीदासांनी रचलेली प्रसिद्ध रामस्तुती अभंगवाणी सादर केली. यानंतर ‘चंदनाची परिमळ’, ‘याहूनी मागणे काय दत्ता’, ‘नाचतो तव भजनी’, ‘हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा’ हे अभंग सादर झाले आणि ‘स्वामी कृपा कधी करणार’ या भैरवी रचनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गो. म. वेदक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांनी रंगले शैक्षणिक संकुल

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर :** विज्ञान म्हणजे कुतूहल, प्रयोगशीलता आणि नवसर्जनाचा संगम आणि हाच संगम अनुभवायला मिळाला तो गो. म. वेदक विद्यामंदिर आणि कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तळा येथे आयोजित शालेय स्तर विज्ञान प्रदर्शनात. 1 डिसेंबर रोजी पार पडलेल्या या भव्य प्रदर्शनाने विद्यार्थ्यांची वैज्ञानिक जिज्ञासा, तांत्रिक कौशल्य आणि नवोन्मेषी वृत्तीचा अप्रतिम आविष्कार घडवून आणला. विज्ञान प्रदर्शनाच्या प्रतिकृती दालनाचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी आणि महादेव बैकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव मंगेश देशमुख यांनी भूषविले.

व्यासपीठावर प्राचार्य दिलीप ढाकणे, पर्यवेक्षक महादेव लोकरे, विज्ञान प्रमुख विनायक महाडकर, प्रा भुरे टी. एन. सौ जयश्री मचे, प्रा शिंदे बी. डी., प्रा जमादार एस. टी., प्रा वाडीकर के. जे., प्रा पाटील एन. सी., प्रा कुळकर्णी बी एस आदी मान्यवरांची उपस्थिती



लाभली. परीक्षक म्हणून रूपा सप्रे आणि काकासाहेब पवार यांनी काम पाहिले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमुख प्रतिकृतींपैकी वॉटर डिस्पेन्सर, मच्छर नाशक अगरबत्ती, ठिबक सिंचन प्रणाली, पक्कड यंत्र, कृत्रिम दंतमंजन, त्रिमितीय प्रतिमा, प्रदूषित वायू निरसन, पिण्याचे पाणी शुद्धीकरण मॉडेल, सौरमाला, ज्वालामुखीचा उद्रेक, पाण्याचे चक्र, रक्ताभिसरण तंत्र, हरितगृह परिणाम, प्रदूषण नियंत्रण, स्मार्ट सिंचन, पवनचक्की, जलविद्युत निर्मिती, सौरऊर्जेचे घर, चुंबकत्व प्रयोग, विद्युत परिपथ, प्रदूषणमुक्त शहर, हवामान बदल मॉडेल, स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, ध्वनीतरंग, अवकाश प्रक्षेपण केंद्र, जलशुद्धीकरण संयंत्र, कृत्रिम पाऊस, पृथ्वीचे अंतर्गत स्तर, वायू प्रदूषण उपाय योजना, स्मार्ट शेती, आपत्कालीन ऊर्जा निर्मिती अशा अनेक उत्कृष्ट संकल्पनांचा समावेश होता. विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रतिकृती, निबंध, वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता ६ ते ८ गटात प्रतिकृती हर्षवर्धन पवार प्रथम, निबंध प्रथमेश्वरी ठमके प्रथम, वक्तृत्व हर्षल आंबेगावे प्रथम, प्रश्नमंजुषा सई वावेकर व ग्रुप प्रथम, इयत्ता ९ ते १२ गटात प्रतिकृती ललित चौधरी व ग्रुप प्रथम, निबंध ठसाळ संस्कृती प्रथम, वक्तृत्व आर्या गायकवाड प्रथम, प्रश्नमंजुषा समीक्षा सावंत व ग्रुप प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप ढाकणेनिवेदन सुहास वावेकर तर आभार सौ. जयश्री मचे व महादेव लोकरे यांनी मानले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, पालक, गो म वेदक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## किडनॅपिंग व पोक्सो च्या आरोपातून दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर-वार्ताहर**

अल्पवयीन मुलीस फुस लावुन जबरदस्तीने अपहरण करून पळवून नेल्याच्या आणि अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याच्पा आरोपातून दोन आरोपींची अहिल्यानगर येथील प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे मॅडम यांनी निर्दोष मुक्तता केली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदनगर येथील कोतवाली पोलीस ठाण्यात पिडितेच्या वडिलांचे फिर्यादी वरुन आकाश उर्फ सचिन अंकुश मिसाळ आणि शरद म्हस्के यांनी जबरदस्तीने किडनॅपिंग केले म्हणून त्यांचे विरुद्ध भादवि 1860 चे कलम 363,366 सह 34 आणि अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केले म्हणून पोक्सो ॲक्ट 2012 चे कलम 11(iv) नुसार गु.र.न. I-509/2021 चा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सदर खटल्याची सुनावणी प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे मॅडम यांचे समोर झाली. सरकार पक्षाकडून एकंदरीत सात साक्षीदार तपासण्यात आले. परंतु कोतवाली पोलीस स्टेशन चे पोलीस यांनी ज्या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला त्या प्रमाणे कुठलाच प्रकार घडला नाही, पिडितेने स्वतः फोनवरून आरोपी सचिन यास बोलावून घेतले होते असे उलटतपासणीत निष्पन्न झाले. तसेच तपासी अंमलदार यांनी सुध्दा गुन्ह्याचा तपास करताना व दोषारोपपत्र दाखल करताना परिपूर्ण काळजी न घेतल्याने आरोपीना विनाकारण काही दिवस तुरुंगात रहावे लागले ही बाब न्यायालया समोर आरोपीच्या वतीने मांडण्यात आली. पिडिता सज्ञान झाल्यानंतर आरोपी सचिन व पिडितेने स्वखुशीने विवाह केल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपीनी पिडितेस कधीच जबरदस्तीने किडनॅपिंग केले नाही आणि अल्पवयीन पिडीतेचे लैंगिक शोषण केले नाही ही बाब सुध्दा आरोपीचे वतीने न्यायालया समोर मांडण्यात आली. सदर खटल्यात आरोपीनी गुन्हा केल्याची बाब निष्पन्न झाली नाही म्हणून या सर्व बाबींवर सविस्तर कायदेविषयक बाबी तपासून प्रधान जिल्ह्या न्यायाधीश यांनी सीआरपीसी 1973 चे कलम 235(1) नुसार आरोपी सचिन उर्फ आकाश अंकुश मिसाळ व शरद रावसाहेब म्हस्के यांची सर्व गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने पुरूष हक्क संरक्षण समिती अहिल्यानगरचे अध्यक्ष ॲड शिवाजी अण्णा कराळे, ॲड करुणा रामदास शिंदे, ॲड सत्यजीत शिवाजी कराळे आणि ॲड मोनाली बन्सी कराळे यांनी कामकाज पाहिले.

## लोक हितकारणी सभा आयोजित संविधान महोत्सवाला उदंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** लोक हितकारी सभा आयोजित संविधान महोत्सवाला नुकतीच सुरुवात झाली संविधानाच्या अमुतमहोत्सवानिमित मोठ्या प्रमाणात या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे 14 डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले या महोत्सवाला परिसरातील विविध मान्यवर उपस्थित लावत आहेत महोत्सवात विविध खाद्य स्टॉलबरोबर साहित्यिक मेजवानी म्हणून विविध पुस्तक स्टॉल लावले आहेत महोत्सवात विविध साहित्यिक व लेखकांचे संविधान विषयक व्याख्यान आयोजित केली आहेत संविधान प्रेमी नागरिकांना हा महोत्सव आकर्षित करत आहे तसेच सामान्य नागरिकांना देखील गेटवर भारतीय



संसदेचे लावलेले तैलचित्र लक्ष वेधून घेत आहे या महोत्सवाला नुकतीच पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती अध्यक्ष निलेश सोनवणे पत्रकार संतोष आमले पत्रकार राजेंद्र कांबळे पत्रकार मुकूंद कांबळे व त्यांच्या समितीने भेट देऊन त्यांचे कौतुक केले या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन लोकहितकारणी सभा प्रणित ॲड सिद्धार्थ इंगळे व संजय बावीस्कर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अगदी सुनियोजित केले आहे त्या बद्दल त्यांचे संविधान प्रेमी नागरीक कौतुक करत आहेत

## निष्ठावंतांना न्याय संजय कांबळे प्रभाव अध्यक्ष तर आशा मुंडे यांची महिला अध्यक्ष म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे खांदा कॉलनी :** खांदा कॉलनी भारतीय जनता पार्टी प्रभाग 15 विभागीय कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली यात प्रभाग 15 अध्यक्ष पदी संजय कांबळे तर महिला अध्यक्षपदी आशा मुंडे यांची निवड प्रामुख्याने करण्यात आली यांच्या निवडीचे खांदा कॉलनीत विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे संजय कांबळे बरेच वर्षे भारतीय जनता पार्टीत कार्यक्रता ते विविध पदावर काम करत होते त्यांच्या निवडीचे विविध सामाजिक स्तरावर स्वागत करण्यात येत



आहे तर आशा मुंडे यांनी आसुडगाव व खांदा कॉलनीत महिला साठी विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत विविध आदोलनात व मोर्चात त्या भारतीय जनता पार्टीच्या महिला कार्यकर्ता म्हणून विषेश सहभाग



नोंदवता दिसत होत्या या दोन्ही सामान्य कार्यकर्त्यांच्या कामाची भारतीय जनता पक्षाने नोंद घेऊन त्याना खांदा कॉलनीत महत्वाच्या पदावर मान होण्याचा सन्मान दिला याबद्दल खांदा कॉलनीतल विविध सामाजिक संघटनांनी त्यांचे स्वागत केले आहे

# पनवेकरांनी पहिला रामायण कथा..

## कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी -** रामायणमध्ये घडलेल्या इतिहासाला विध्यार्थीना रामायण या नाट्यतुन सादरीकरण केले. यावेळी पनवेलकरांना रामायण पाहण्याची संधी मिळाली.पनवेल येथील कोकण एज्यकेशन सोसायटीच्या इंदुबाई वाजेकर इंग्लिश मिडीयम विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी ता. 28 रोजी संपन्न झाले. शाळेच्या इंग्रजी माध्यमाच्या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यामध्ये पोवाडा, कीर्तन, जोगवा, नाटिका व नृत्य या कलाप्रकारांचा समावेश होता. प्रतिवर्षी कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी



संस्कार सुमने ही संकल्पना साकारत शांती, संयम, विवेक व करु णा या गुणांचा अंगीकार करून त्यांच्यावर मात करावी व मनाला सुदृढ करून निकोप आयुष्य जगण्याचा संदेश दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष गायन व वादन करत नृत्य सादर केले. कार्यक्रमाची संहिता विद्यार्थ्यांनीच लिहिली होती. शाळेतील विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी यांच्यासह चेअरमन व्ही. सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ आदींसह पालक मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

रामायण कथाने पनवेलकर भारवले..

रामायणामध्ये घडलेल्या संपूर्ण इतिहास के.ई.एस इंदुबाई वाजेकर स्कूलमधील इयत्ता आठवी, नववी, दहावीतील 106 विध्यार्थी, विध्यार्थीनी यांनी एकत्रित येत. रामायण कथा सादरीकरण केले. विशेष करून चेअरमन व्ही. सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखली अवणी देशपांडे, विनोधीनी, सायली शिंदे, सुचिता म्हात्रे, पूनम, पल्लवी, प्रगती, आज्मा, प्राजक्ता, भक्ती, दीपा या शिक्षिका यांनी मेहनत घेऊन ही कथा तयार केली त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. तसेच आरती वर्मा, संजीवनी या शिक्षकांनी डोंबारीनृत्य तयार केलेले विध्यार्थीने नृत्य सादर केले.

# पुष्पक नगरसाठी एनएमएमटी बस सेवा लवकरच सुरु होणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/वार्ताहर :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर पुष्पक नगर ही नवी वसाहत तयार होत आहे. पुष्पक नगर हे नियोजित शहर आकार घेत असताना या ठिकाणी नागरिकांना समस्या भेडसावत आहे ती सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची. विमानतळा नजीक असलेल्या शहराचे भविष्य उज्ज्वल आहे. त्यामुळे भविष्यात येथील नागरिकीकरण झपाटयाने वाढणार आहे. त्यामुळे येथे एमएमएमटीची बससेवा सुरु करण्यासाठी दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेमार्फत एनएमएमटी बस सेवा पुष्पक नगरसाठी सुरु करावी असे निवेदन संस्थेचे अध्यक्ष सुनिल कटेकर यांनी ना. गणेश नाईक यांच्या जनता दरबारात दिले. ते वाचल्यावर लगेचच त्यावर सकारात्मक भूमिका घेत त्यांनी येथे उपस्थित असलेल्या एनएमएमटीच्या पदाधिकाऱ्यांना त्यावर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले. यावेळी एनएमएटीचे अधिकाऱ्यांनीही यावेळी सकारात्मक प्रतिसाद लवकरच



याबाबत पाऊले उचलण्याचे आश्वासित केले.

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या एनएमएमटीच्या बससेवेचा लाभ बहुसंख्य पनवेलकरांना होत आहे. ही सेवा पनवेलकरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. दापोली, श्रीरामनगर परिसरात लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांना विमानतळ प्राधिकरण पुष्पकनगर नोड विकसित करीत आहे. येथील नागरिकीकरण झपाटयाने वाढणार आहे. मात्र या ठिकाणाहून रहिवाशांना येण्याजाण्यासाठी कोणतीही सार्वजनिक सेवा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना नाहक भूर्दंड पडत आहे. तसेच या ठिकाणी भविष्यात येवू पाहणाऱ्या रहिवासीही या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सेवा नसल्याने फारसे उत्सुक दिसत नाहीत. तरी आपण या नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नाचा विचार करुन एनएमएमटी बस पनवेल, वडघर, करंजाडे, वरचे ओवळे, कॉलेज फाटा, टी पॉईंट, दापोली, श्रीराम नगर, मानघर, दापोली मार्गे पुष्पक नगर तसेच खांदेश्वर रेल्वे स्थानक, टी पॉईंट, दापोली, श्रीराम नगर, मानघर, कुंडेवहाळ, सेक्टर 3 तसेच बेलापूर, विमानतळ, वहाळ, गव्हाण फाटा, कुंडेवहाळ, श्रीराम नगर, मानघर, दापोली पुष्पक नगर अशा मार्गावर एनएमएटी सेवा

## कैलास गोरठेकर यांच्या आपीलला हायकोर्टाने याचिका फेटाळली

### कोर्टाचा निकाल संदीप पाटील कवळे यांच्या बाजूने लागला

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कैलास श्रीनिवासराव देशमुख गोरठेकर यांनी



मजूर सेवा सोसायटी अंतर्गत बनावट प्रमाणपत्र जोडून संचालक पदाचे निवडणूक लढविली यात गोरठेकर विजयी झाले होते. परंतु प्रतिस्पदी साखर सम्राटाचे सुपुत्र संदीप मारोतराव कवळे यांनी त्यांच्या बनावट प्रमाणपत्राच्या पुरावे घेऊन नांदेडच्या न्यायालयात धाव घेत न्यायालयात प्रकरण न्याय प्रविष्ट केले.तेंव्हा सदरच्या नांदेड न्यायालयाने कागदपत्राची तपासणी केली असता संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांचे मंजूर सेवा सहकारी चे कागदपत्रे बनावट आढळून आले तेव्हा नांदेडच्या न्यायालयाने संचालक पद अवैध ठरवले. कैलास गोरठेकर यांनी अपिल याचिका औरंगाबादच्या कोर्टात दाखल केले होते. तेव्हा औरंगाबादच्या खंडपीठाने स्थगितीचे आदेश दिले होते. तेव्हा संदीप मारोतराव कवळे यांनी पुराव्यासह आणि नांदेडच्या कोर्टाच्या निकालाची प्रत घेऊन हायकोर्टात याचिका दाखल केली परंतु हायकोर्ट यांनी कैलास देशमुख गोरठेकर याची कागदपत्राची तपासणी केली असता ते बनावट आढळून त्यांची याचीका फेटाळून लावण्यात आली. त्यामुळे जिल्हा बँकेचे संचालक कैलास गोरठेकर यांच संचालक पद रद्द झाले.

# सोयगाव वनपरिक्षेत्र कार्यालयात संविधान दिन बहिष्कृत?

**अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट; चौकशीची जोरदार मागणी**

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** देशभरात ७५ वा संविधान दिन धुमधडाक्यात साजरा होत असताना सोयगाव वनपरिक्षेत्र कार्यालयात हा दिवस जाणीवपूर्वक पाळण्यात आला नाही,असा गंभीर आरोप रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष अंकुश पगारे व स्थानिक नागरिकांनी केला आहे.या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून संविधान व संविधाननिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा,संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी संविधान दिन साजरा करण्यात आला. मात्र, सोयगाव वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ व कर्मचाऱ्यांनी हा दिवस पूर्णपणे दुर्लक्षित केल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नागरिकांनी आरोप केला की "हे साधे दुर्लक्ष नाही.संविधानाचा अवमान आणि लोकशाहीला केलेला थेट विरोध आहे. सरकारी अधिकाऱ्याकडून हा प्रकार गंभीर असून तो क्षम्य नाही."मिळालेल्या माहितीनुसार संबंधित


अधिकाऱ्यांनी या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना

"मी घरच्या कार्यक्रमात व्यस्त होतो"असा दिलासा देणारा पण जबाबदारी टाळणारा खुलासा केल्याची चर्चा आहे.ग्रामस्थांचे मत स्पष्ट आहे. "शासकीय पदावर असताना संविधानापेक्षा वैयक्तिक कार्यक्रम मोठे कसे ?

हा राष्ट्रावरील आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर थेट अनादर आहे."नागरिकांनी शासनाला आवाहन केले आहे.की संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ चौकशी करण्यात यावी, तसे निवेदन माननीय तहसीलदार साहेब यांना देण्यात आले आहे व दोष सिद्ध झाल्यास निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी भविष्यात अशा प्रकारे संविधान दिनाचे अवमूल्यन करणाऱ्यांवर कडक शिक्षेची तरतूद केली जावी.

# मुलीच्या शोधासाठी आईचे आष्टी तहसील समोर उपोषण

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

: तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावातील व धानोरा येथील एका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता बारावी मध्ये शिकत असलेली अल्पवयीन मुलगी फुस लावून पळवून नेली. या घटनेला तीन महिने झाले तरीही अंभोरा पोलिसांना 'त्या' अल्पवयीन मुलीचा शोध लावता आलेला नाही. त्यामुळे मुलीची आई व नातेवाईकांनी रीतसर गुन्हा दाखल केल्यानंतरही तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार व पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदन दिले. तरीही अद्याप पर्यंत मुलीचा शोध लागला नाही. मुलीचा पोलीसांनी शोध घ्यावा यासाठी मुलीची आई व नातेवाईकांनी तहसील कार्यालय आष्टी येथे दि १ डिसेंबर रोजी पासून आमरण उपोषणाला सुरू केले आहे.

आष्टी तहसीलदार यांना मुलीची आई आशाबाई पठारे यांनी दिलेल्या




निवेदनात म्हटले आहे की, दि 15 ऑक्टोबर 2025 रोजी पोलीस स्टेशन अंभोरा यांच्या हलगर्जी पणाला कंटाळून उपोषणाचा अर्ज केला होता. परंतु तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक तावरे यांनी आमच्याकडून 15 दिवसाची मुदत मागितली होती. त्या कारणास्तव आम्ही उपोषण पुढे ढकले होते. त्यानंतर आम्ही वारंवार त्यांच्याशी संपर्क करून प्रत्यक्ष भेटून माझी मुलगी हिचा शोध का लागला नाही अशी विचारणा केली असता आम्हाला उडवा उडवीचे उतरे दिले. माझा भाऊ आजिनाथ आल्हाडे व तपास अधिकारी सोबत कल्याण येथे

> आष्टी तालुक्यात दिवसेंदिवस मुलींच्या छेडछाडीचे प्रकार वाढत असल्याचे दिसून येत आहे तसेच रोड रोमिओने सुद्धा महाविद्यालयीन परिसरात धुमाकूळ घातलेला आहे. याकडे आष्टी व आंभोरा पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसून येत असल्याने वरील प्रकारच्या घटना कारणीभूत ठरत आहेत.त्यासाठी अंभोरा पोलिसांनी महाविद्यालय परिसरात ग्रस्त घालण्याची मागणी पालकातून होत आहे.

माझ्या मुलीचा शोध घेण्यासाठी गेले असता, कुठली ही ठोस कारवाई केली नाही व ज्या व्यक्तीने आरोपीला आश्रय दिला त्याला सही सलामत सोडून दिले व आरोपी शैलेश सतीश आटोळे याला तेथून जाण्यासाठी वाट मोकळी करून दिली. मी पोलीस अधीक्षक बीड यांना प्रत्यक्ष भेटून सदर घटनेची माहिती दिली व तपास जलद गतीने होण्यासाठी व आरोपीला लवकर अटक व्हावी म्हणून निवेदन दिले होते. परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. सदर प्रकरणांमध्ये 1 सतीस आटोळे (मुलाचे वडील) 2. संजय गाढवे (मुलाचे मामा) ३.रमेश गावडे 4. राहुल राठोड यांचा हस्तक्षेपामुळे पोलीस यंत्रणांवर दबाव टाकत आहेत. आरोपी यांचे नातेवाईक आम्हाला त्रास देतात. पोलीस स्टेशनला गेले असता आरोपीचे नातेवाईक तेथे येतात व तुम्हाला तुमची मुलगी मिळणार नाही. तिचा नाद सोडून दे म्हणत माझी व माझ्या मुलीची निंदा करतात.

मला कोणाचाही आधार नाही, आरोपीचे नातेवाईक व पोलीस स्टेशन अंभोरा यांना वैतागून त्यामुळे तहसील कार्यालय आष्टी येथे आमरण उपोषणाला बसले आहे जो पोलीस मुलीचा शोध घेत नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवणार असल्याचा इशारा मुलीच्या आईने दिला आहे.

---

# राजेंद्र सपकाळे यांची विद्यार्थ्यांसाठी ११,१११ रुपयांची देणगी – पळसखेड्यात क्रीडेची नवी उर्मी"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

सोयगाव:- तालुक्यातील पळसखेडा "मित्रांच्या दुनियेतील बादशाह" म्हणून ओळखले जाणारे उदार मनाचे व्यक्तिमत्त्व राजेंद्र उत्तमराव सपकाळे यांनी आज दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पळसखेडा येथे भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत शाळेतील क्रीडा विभागासाठी रु. ११,१११ /- इतकी उदार देणगी जाहीर केली. या देणगीमुळे शाळेतील क्रीडा सुविधा अधिक सक्षम होऊन विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार, स्पर्धात्मकता आणि आत्मविश्वास वाढण्यास



मोठी मदत होणार आहे.राजेंद्र सपकाळे हे केवळ शिक्षक नसून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान,समाजासाठी आदर्श आणि निस्वार्थ देणगी संस्काराचे प्रतीक आहेत. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आणि सहृदय स्वभावाची ही कृती त्यांचे मोठेपण पुन्हा अधोरेखित करते.यावेळी शिक्षक सेना तालुका अध्यक्ष व आदर्श शिक्षक रवींद्र शेळके विशेष उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांचे शाळेत आगमन होताच विद्यार्थ्यांनी उत्साहाने स्वागत केले. कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक अनिल ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ, शाल व पुष्पगुच्छ देऊन दोन्ही मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य व अध्यक्ष उपस्थित होते व शिक्षकवृंदामध्ये अर्जुन पारधे,वासुदेव कोळी,अवधूत कोष्टी,लक्ष्मण सोनवणे,मालाठे,जाधव,रिजवान शेख आणि कासार सर उपस्थित होते.शाळेच्या विकासासाठी सदैव पुढाकार घेणारे अशा व्यक्तिमत्त्वांचे योगदान विद्यार्थ्यांच्या भविष्यात नक्कीच सकारात्मक बदल घडवणार आहे.

# सटाणा नगरपरिषद निवडणुक मतदान संपन्न ; मतमोजणी ३ डिसेंबर ऐवजी २१ डिसेंबरला होणार..

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी - दिपक गायकवाड**

: बागलाण ता.२ - नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुका २ डिसेंबर रोजी पार पडल्यात सटाण्यात मतदान केंद्र १० वगळता सर्वत्र शांततेत मतदान पार पडले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नशीब आजमावणारे उमेदवार यांचे मतदान केंद्रात आज रोजी जनमत यंत्रात कैद झाले नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये निवडणुकीचा निकाल(मतमोजणी) 3 डिसेंबर




रोजी होती, त्यात फेरबदल करत तब्बल १९ दिवस पुढे ढकलत उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मध्ये साठवून ठेवत उमेदवारांची धाकधूक वाढवली आहे.यावेळी अनेक उमेदवारांनी नाराजी व्यक्त करत निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले तर इतर उमेदवारांनी निवडणूक आयोगावर भरवसा व्यक्त केला.सटाणा शहरात थेट नगराध्यक्ष पदासाठी नगर परिषदेत तिरंगी लढत;तर सेवक पदासाठी ७४ उमेदवार रिंगणात असून एकूण २४ जागा आहेत. भाजपने सुरुवातीलाच दोन उमेदवार बिनविरोध निवड करत खाते उघडले आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली असून यात कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दुपारी ३.३० पर्यंत ५५.१५ टक्के मतदान झाले होते तर यात पुरुषांचा ९८६६ व महिला ९३३५ मतदारांनी मतदान केले.

---

# खडके बुद्रुक येथे ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती निमित्ताने यात्रा उत्सव

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील** : एरंडोल तालुक्यातील खडके बुद्रुक येथे सालाबादप्रमाणे दिनांक चार. डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती निमित्ताने यावर्षी देखील यात्रा उत्सव भरणार असून या यात्रेत परिसरातील नागरिक,व भाविक भक्त नवस फेडण्यासाठी येत असल्याने यासह यात्रेत खेळण्याची दुकाने,पाळणे,



गारुडी,यासह विविध प्रकारचे खेळ देखील येत असतात,भाविक व नागरिकांना आस्वाद घेण्यासाठी शेव व जिलेबी चे दुकाने देखील मोठ्या प्रमाणावर येतात तसेच रात्री मनोरंजनासाठी नऊ वाजता श्री बंडू नाना धुळेकर यांचा आदर्श असा लोकनाट्य तमाशा मंडळाचा कार्यक्रम देखील रात्री होणार असून व पाच तारखेला देखील श्री शालिक शांताराम यांचादेखिल लोकनाट्याचा कार्यक्रम होणार असून गावकऱ्यांच्या वतिने व व्यवस्था म्हणून पंच कमिटी यांचे सहकार्य लाभणार आहे

# स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था सुमारे दोन तपे शासनाच्या लालफितीत

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (नासिकेत पानसरे) :** स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था ( नियो) या संस्थेने दि ४ सप्टेंबर २००३ रोजी म्हाडा मुंबईकडे सदनिका मिळाव्यात या करिता लेखी अर्ज दाखल केला होता. म्हाडा प्राधिकरणाच्या बैठकीत विनियम १३ (२) अंतर्गत ठराव क्र.६०२८ दिनांक १३ जुलै २००४ रोजी या संस्थेस ८४ सदनिका वितरीत करण्याबाबत नुसार सुमारे १६ गृहनिर्माण संस्थाना गृहनिर्माण राबविण्यासाठी 'ठराव मंजूरीसाठी पाठविण्यात आला. त्यापैकी प्रत्येक संस्थाना काही ना काही सदनिका देण्यात आल्या. परंतू याच यादीतील एकमेव स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था सुमारे दोन तपे शासनाच्या लालफितीत अडकली असून संख्येला अद्यापपर्यंत एकही सदनिका देण्यात आलेली नाही.संस्थेचे मुख्य प्रवर्तक डॉ. प्रल्हाद खंदारे यांनी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे आयोगाचे अध्यक्ष व आनंदराव अडसूळ यांच्याकडे या मागासवर्गीय सभासद असलेल्या संस्थेवर म्हाडा प्राधिकरण व राज्य प्रशासनातील मागासवर्गीय काही जातीवादी अधिकारी यांच्याकडून २० वर्षापासून मागासवर्गीय संस्थेच्या लोकांवर झालेल्या अन्याया संदर्भात न्याय मिळणेबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता.याबाबत आयोगाकडून १९ मे २०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात उपसचिव गृहनिर्माण विभाग मंत्रालय यांच्या वतीने सुनिल उकिर्डे, अवर सचिव प्रमोद पंडीत, कक्ष अधिकारी, म्हाडा उपमुख्य कार्यकारी अधिकारी बांद्रा यांच्या वतीने गोपीनाथ ठोंबरे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी पणन उपस्थित होते.सदर प्रकरणी सुनावणीस उपस्थित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.आयोगाने निदर्शनास आणले की सदर प्रकरण २००३ पासून अर्जदार यांनी ८४ सदनिकांपैकी ५० सदनिकांची मागणी केली आहे. अर्जदार डॉ. प्रल्हाद खंदारे यांनी केलेल्या मागणीनुसार लॉटरी सिस्टीम न टाकता ५० लोकांना घरे देण्याबाबतची स्वतंत्र टिपी शासनास सादर करुन एक महिन्याचा आत आयोगास सादर करावा असे निर्देश आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ सांनी दिले आहेत.परंतु सायन प्रातिक्षा नगर येथील पाच गृहनिर्माण संस्था, घाटकोपर येथील दोन गृहनिर्माण संस्था, अंधेरी सांताक्रूझ, जोगेश्वरी येथील प्रत्येकी एक गृहनिर्माण संस्था अश्या एकूण १५ गृहनिर्माण सोसायट्यांना सदनिका वाटप करण्यात आल्या परंतू फक्त एकमेव स्वयंभू कोकण मागासवर्गीय सहकारी संस्थेला एकही सदनिका वाटप करण्यात आलेले नाही. त्यामूळे ही संस्था शासनाच्या लालफितीत अडकली आहे.

---

# पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड; राज्य बेंचप्रेस स्पर्धेत रायगडचे उल्लेखनीय यश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** ज्ञानेश्वर महाविद्यालय वडाळा मुंबई 31 येथे राज्यस्तरीय बेंचप्रेस क्लासिक व इक्विप स्पर्धा नुकतीच पार पडली. दिनांक 28 ते30 नोव्हेंबर2025 या कालावधीत झालेल्या स्पर्धेत रायगडच्या पुरुष व महिला खेळाडूंनी 15 स्वर्ण, 09 रौप्य आणि 09 कांस्य अशी एकूण 33 पदके प्राप्त केली. तसेच रायगडचा खेळाडू अब्दुल्ला दस्ते(क्वाडझीला जिम महाड) हा "स्ट्रॉंग मॅन ऑफ महाराष्ट्र ज्युनियर" क्लासिक पुरुष गटात उत्कृष्ट ठरला. तसेच रायगड जिल्ह्याला क्लासिक स्पर्धेत ज्युनियर पुरुष गटाचे सांघिक विजेतेपद प्राप्त झाले. रायगड संघाचे व्यवस्थापक म्हणून सुभाष दगडू टेंबे तर सहाय्यक म्हणून संदीप कृष्णा पाटकर आणि प्रशिक्षक म्हणून माधव पंडित यांना जबाबदारी दिली होती.. *रायगडच्या पदक, किताब आणि सांघिक






विजेतेपद प्राप्ती बाबत संघटनेचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक*, *कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल*, *सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, खजिनदार राहुल विजय गजरमल, संघटनेचे* *ज्येष्ठ क्रीडापटू माधव गोविंद पंडित, सदस्य मानस कुंटे आणि सचिव अरुण पाटकर यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पदक प्राप्त खेळाडू पुढील प्रमाणे आहेत.सुवर्णपदक प्राप्त मुलं*-*१)अद्वैत* भोसले,महाड*२) अब्दुल्ला दस्ते ,महाड३) तन्मय पाटील पेण ,४) शंतनु जोशी कर्जत ५) नितीन शेजवळ खोपोली ६) दिनेश पवार खोपोली , ७) सचिन देशमुख खोपोली, ८) ऋषिकेश घोसाळकर, खोपोली ९) हर्षद देशमुख कर्जत १०) हनुमंत खरात कर्जत ११) जितेश साजेकर पेण (गतिमंद मुलांची स्पर्धा )

***सुवर्णपदक प्राप्त मुली** - १) अमृता भगत, खोपोली, (२ सुवर्ण पदक)२) गायत्री बडेकर, कर्जत ३) अंजली येवले, कर्जत

*रौप्य पदक प्राप्त मुले खेळाडू*-१) झाहिद काणेकर,महाड

२) मयुरेश म्हात्रे, खोपोली ३) आसिफ सय्यद, खोपोली ४) ऋतिक पोळ,खोपोली ५) नासिर सय्यद, खोपोली, ६) राज कडू कर्जत,७) ऋतिक पोळ, खोपोली

*रौप्य पदक प्राप्त मुली*-- १) वैष्णवी गंगावणे, कर्जत २) प्रणाली माने, खोपोली३) आशा घरत, पेण

*कांस्यपदक प्राप्त मुले खेळाडू* -- १) साई पाटील, पेण२) रौनक जितेकर, दापोली पनवेल ३) सुरज धीमल, खोपोली४) संदीप सावंत, खोपोली५) विवेक धाकवल,कर्जत६) यश पंगत, पेण (गतिमंद मुलांची स्पर्धा)

*कांस्यपदक प्राप्त मुली खेळाडू* -- १) अनुषा बॅनर्जी, पनवेल२) संगीता पंगत, रसायनी पनवेल

वरील खेळाडूतील निवडक खेळाडू हे राष्ट्रीय स्पर्धेत जातील.

# माउंट लिटरा झी स्कूल महागाव येथे संविधान दिन साजरा

**दैनिक युवक आधार:एम. डी.सुरोशे**
**महागाव (यवतमाळ)** : माउंट लिटरा झी स्कूल, महागाव येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन करून विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची प्रेरणा देण्यात आली.

दरम्यान, मागील महिन्यात पार पडलेल्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचा पदग्रहण आणि शपथविधी सोहळा संविधान दिनाच्या औचित्याने पार पडला. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या



प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याची शपथ घेतली.या कार्यक्रमाला महागाव स्टेशनचे निरीक्षक धनराज निळे, सहाय्यक निरीक्षक सरस्वती राठोड, संस्था संचालक परवेज सुरैय्या, विशाल पांडे तसेच प्राचार्य मोहना रेड्डी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षकांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेतील विद्यार्थ्यांनी केले. देशाच्या भविष्यासाठी संविधानिक मूल्यांचे अंगीकरण करून सक्षम नागरिक घडविण्याचा संकल्प या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

# जासई हायस्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** उरण येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनिअर कॉलेज, जासई विद्यालयामध्ये बुधवार, दिनांक २६/११/२०२५ रोजी शालेय पातळीवरील विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनासाठी शाळेचे चेअरमन मा. श्री अरुणशेठ जगे साहेब, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी मॅडम, उपमुख्याध्यापक श्री. कुटे सर, पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम, इयत्ता दहावी अच्या गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी फुंडे हायस्कूल येथून आलेले तज्ञ शिक्षक, शाळेचा शिक्षकवृंद तसेच शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त शाळेच्या परिपाठामध्ये भारतीय संविधानाचे सर्वांकडून वाचन करण्यात आले. त्यानंतर २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना दोन मिनिट शांतता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शाळेचे चेअरमन माननीय श्री अरुणशेठ जगे साहेब यांच्याहस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रोबोटद्वारे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांनी इयत्ता ५ वी ते १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी मांडलेली उपकरणे पाहून त्या उपकरणाची माहिती जाणून घेतली. विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना शाळेचे चेअरमन माननीय श्री अरुणशेठ जगे साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी. मॅडम यांनी देखील विज्ञान आणि दैनंदिन जीवन या विषयावर विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. इयत्ता पाचवी ते आठवीच्या




गटामधून तीन तर इयत्ता नववी ते बारावीच्या गटामधून तीन तीन उपकरनांची निवड करण्यात आली. त्यापैकी दोन्ही गटातील प्रथम क्रमांकाची निवड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी करण्यात आली. कार्यक्रमाचे शेवटी शाळेच्या ज्येष्ठ विज्ञान शिक्षिका सौ. ठाकूर एस. ए. मॅडम यांनी विज्ञान प्रदर्शनासाठी उपस्थित शाळेचे माननीय चेअरमन श्री अरुणशेठ जगे साहेब शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी. मॅडम, उपमुख्याध्यापक श्री. कुटे सर, पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम, गुरुकुलच्या १० वी अ च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे फुंडे हाय स्कूल येथील तज्ञ मार्गदर्शक, शाळेचा शिक्षकवृंद, विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेले विद्यार्थी या सर्वांचे आभार मानून विज्ञान प्रदर्शनाचा कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

# स्वयंपुनर्विकासाच्या मार्गाने गेल्यास सोसायट्यांना आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि दीर्घकालीन सुरक्षितता मिळते

## माजी म्हाडा अध्यक्ष व वरिष्ठ वास्तुविशारद चंद्रशेखर प्रभू यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (प्रतिनिधी) :** स्वयंपुनर्विकासाच्या मार्गाने पुढे गेलेल्या सोसायट्यांना आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि दीर्घकालीन सुरक्षिततेचे मजबूत लाभ मिळतात, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते चंद्रशेखर प्रभू यांनी व्यक्त केले. पुनर्विकास प्रक्रियेत बिल्डरच्या निर्णयांवर अवलंबून राहावे लागत नसल्याने, गुणवत्ता, खर्च आणि वेग यांवर नियंत्रण स्वतः रहिवाशांकडे राहते. शहरांमध्ये पुनर्विकासाशी निगडीत निर्माण होणाऱ्या विवादांच्या पार्श्वभूमीवर सोसायट्यांनी एकजूट व जागरूकतेने पुढे जाणे अत्यावश्यक असल्याचे प्रभू यांनी सांगितले. ते पनवेल प्रेस क्लबच्या वतीने आयोजित "सोसायट्यांचा स्वयं पुनर्विकास : पनवेलचा शाश्वत विकास" या चर्चासत्रात बोलत होते.

या कार्यक्रमाला दैनिक युवक आधार चे संपादक संतोष आमले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आत्माराम गावंड, ॲड. मनोज म्हात्रे, संस्थेचे ज्येष्ठ पत्रकार अविनाश पाटील, उपाध्यक्ष सागर पगारे, प्रसाद परब, सुनील भुजबळ,



अनिल पाटील आदी उपस्थित होते. विविध सोसायट्यांचे पदाधिकारी व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी विस्तृत मार्गदर्शन करताना प्रभू म्हणाले, "बिल्डरद्वारे होणाऱ्या पुनर्विकासात अनेक अटींचे गैरसमज ठेवले जातात. करारातील तरतुदी बदलून सोसायट्या अडचणीत येतात. प्रकल्प लांबणे, दर्जाहीन बांधकाम, तांत्रिक माहिती न देणे, दस्तऐवजांमधील अस्पष्टता या समस्या वारंवार दिसतात. परंतु स्वयं पुनर्विकासात सत्ता तुमच्या हातात असते. निर्णय तुम्ही घेताता, निधीची शिस्त तुमच्याकडे असते आणि कामाचा वेगही तुम्हीच ठरवू शकता."

त्यांनी कायदेशीर प्रक्रिया, तांत्रिक तपासणी, निविदा पद्धती, पीएमसी ची भूमिका, आर्थिक अंदाजपत्रक, अतिरिक्त एफएसआय तसेच प्रकल्प व्यवस्थापन यावर सविस्तर उदाहरणांसह माहिती दिली.यावेळी पनवेल प्रेस क्लब अध्यक्ष देविदास गायकवाड म्हणाले की, "पनवेलमध्ये पुनर्विकासाची मोठी लाट आहे; पण चुकीचे करार, अपुऱ्या माहितीवर घेतलेले निर्णय आणि कायदेशीर अज्ञान यामुळे अनेक सोसायट्या अडचणीत सापडतात. म्हणूनच योग्य माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि रहिवाशांची एकजूट अत्यंत महत्त्वाची आहे. प्रभू यांसारख्या अभ्यासू तज्ज्ञांचे मत ऐकल्याने नागरिकांना योग्य दिशादर्शन मिळते. पनवेल प्रेस क्लब केवळ वृत्तसंकलनापुरता मर्यादित नसून शहराच्या विकास प्रक्रियेला दिशा देणे हाही आमचा प्रयत्न आहे."

अध्यक्षांनी पुढे अशा उपयुक्त कार्यक्रमांची मालिका राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रभू यांनी सविस्तर उत्तरे दिली. बांधकामाचा वेग, निधी उभारणी, तात्पुरती राहण्याची व्यवस्था, सदस्यांचे हक्क, तांत्रिक मानदंड, व्यवहारातील पारदर्शकता या मुद्द्यांवर नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.चर्चेअंती अनेक सोसायट्यांनी स्वयं पुनर्विकासाचा पर्याय गांभीर्याने विचारात घेण्याची तयारी दर्शवली. पनवेलमध्ये पुनर्विकासाविषयी अधिक माहितीपूर्ण, संघटित आणि जबाबदार वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र या कार्यक्रमातून दिसून आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसाद परब, सुनील भुजबळ आणि अनिल पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

# जिवाणू हा शेतीचा आत्माच, आपल्या मातीमध्ये जिवाणूंना मोठे महत्त्व द्यावे लागेल – गोपाल उगले पाटील

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** नागपूर-हिंगोली येथूनच जवळ असलेल्या औंढा नागनाथ तालुक्यातील येळेगाव या गावातील प्रगतशील शेतकरी शुभम सोळंके यांच्या शेतामध्ये हरभरा पिकावर बायोफॅक्टर कंपनी मार्फत प्रात्यक्षिक पीक पाहणी व मार्गदर्शनपर कार्यक्रम करण्यात आला होता. संबंधित हरभरा पिकाच्या पेरणी वेळी बायोफॅक्टर कंपनीचे जैविक खताचा वापर गोपाल उगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला होता त्यानंतर काही दिवसातच जैविक खताचा वापर केल्याने हरभरा पिकामध्ये उत्तम असा फरक दिसून आला. त्यामुळे थेट शेतावरच मार्गदर्शन पर कार्यक्रम आयोजित केला होता.

त्यावेळी मार्गदर्शक (बायोफॅक्टर इनपुट प्रायव्हेट लिमिटेड) गोपाल उगले पाटील हे होते तर कार्यक्रमाचे आयोजन कंपनीचे तालुका प्रतिनिधी ज्ञानेश्वर गौरकर व गावातील प्रगतशील शेतकरी शुभम सोळुंके, माऊली सोळुंके यांनी केले होते.

सदर कार्यक्रम हा दि. २ डिसेंबर



मंगळवार रोजी सकाळी पार पडला. त्यामध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने शेतीसाठी बहुउपयोगी जिवाणू खते (बायो फर्टीलायझर) , जैविक कीटकनाशके, जैविक बुरशीनाशके याची ओळख आणि आपल्या शेतीत वापर कसा करावा? केव्हा करावा? याचे फायदे कशाप्रकारे होतात? शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांची वाढ कशी करावी?

त्याचबरोबर रायझोबियम, अझोटोबॅक्टर, हुमिक एसिड, मायकोरायझा, ट्रायकोडर्मा, बिव्हेरिया, मेटारायझियम, नत्र, स्फुरद व पालाश विघटन करणारे जिवाणू यांचा शेतीसाठी होणारा फायदा. यावर सखोल व मोलाचे मार्गदर्शन गोपाल उगले पाटील यांनी केले.ते बोलताना समोर असे म्हणाले की जिवाणू हा शेतीचा आत्मा आहे, आपल्या मातीमध्ये जिवाणूंना मोठे महत्त्व द्यावे लागेल, त्यावेळी आपल्याला समाधानकारक उत्पन्न मिळून शेतीचा खर्च कमी झालेला दिसेल. आपल्या शेतीचे उत्पन्न हे शेतीतील मातीमध्ये जिवाणूंची संख्या किती आहे यावर अवलंबून आहे. ज्यावेळी आपण आपली माती जिवाणूंनी श्रीमंत करू त्याच वेळी आपले उत्पन्नही त्याच पद्धतीने वाढेल आणि रासायनिक खतांचा खर्च कमी होईल. जिवाणूंची शेती ही फायदेशीर शेती आहे अनेक वर्षांपासून आपण रासायनिक खते जमिनीमध्ये टाकून आपली जमीन न- परवडणारी आणि निर्जीव करून ठेवली आहे त्यामुळे आता आपल्याला जिवाणूंचा वापर करून शेती जिवाणूंनी श्रीमंत करावी लागणार आहे. हल्ली आपल्या शेतजमिनीची परिस्थिती खूप गंभीर होत चालली आहे त्यामुळे आता आपल्या शेतीमध्ये जिवाणूंचा वापर करावा लागणार आहे. शेतजमिनीची परिस्थिती पंजाब आणि हरियाणा राज्यासारखी होऊ नये यासाठी अभ्यास करून जिवाणूंचा वापर आपल्या शेतीत करावा लागेल.कार्यक्रमाच्या शेवटी चर्चासत्र पार पडले त्यामध्ये सेंद्रीय शेती का करावी? जैविक खतांचा वापर कसा व कधी करावा? सेंद्रिय शेतीचे फायदे याबाबत चर्चा झाली त्यानंतर गावातील शेतकऱ्यांनी सुद्धा सेंद्रीय शेती करण्याचा निश्चय त्यावेळी घेतला. त्यानंतर कार्यक्रमांमध्ये उपस्थित असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी अल्पोहार केला.

# श्रीवर्धनमध्ये ६६.२३ टक्के मतदान; शांततेत निष्पक्ष प्रक्रिया

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीत आज मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लोकशाहीचा उत्सव साजरा केला. पहाटेपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांची रांग दिसू लागली होती. वातावरणात उत्साह, अपेक्षा आणि लोकशाहीवरील विश्वास स्पष्टपणे जाणवत होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडली आणि दिवसअखेर ६६.२३ टक्के मतदानाची नोंद झाली. यावेळी महिलांचा सहभाग अधिक लक्षणीय ठरला. ४,१९२ महिला मतदारांनी हक्क बजावला, तर ४,१७८ पुरुषांनी मतदान करून निवडणूक प्रक्रियेत




सहभाग नोंदवला. शहरातील ज्येष्ठ नागरिकांपासून तरुणांपर्यंत सर्वांनी समान उत्साह दाखवला. प्रशासन, निवडणूक विभाग आणि पोलीस यंत्रणेच्या नियोजनामुळे मतदारांना कोणताही त्रास सहन करावा लागला नाही. निवडणूक केंद्रांवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, रॅम्प व सुविधांची व्यवस्था असल्यामुळे दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांनाही सहज मतदान करता आले.दिवसभर शांतता आणि संयमाचे वातावरण राहिल्याने निवडणुकीनंतर शहरात समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

# अमरज्योत मित्र मंडळातर्फे श्रीदत्त जयंती उत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** अमरज्योत मित्र मंडळ सेवानगर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दि.०२,०३,०४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीदत्त जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून,मंगळवार दि.०२ डिसेंबर रोजी रात्री ०९ ते १० या वेळेत ओंकार प्रासादिक सुस्वर भजन मंडळ यांचे प्रसादिक भजन आयोजित करण्यात आले तर बुधवार दि.०३ डिसेंबर रोजी एकांकिका व




नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर गुरुवार दि.०४ डिसेंबर रोजी श्रीदत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद आणि दत्त प्रासादिक सुस्वर भजन आयोजित करण्यात आले आहे.तरी सर्व भाविक दत्त भक्तांनी सहकुटुंब सहपरिवार यावेळी या श्रीदत्त उत्सवाला उपस्थित राहून श्रीदत्त दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अमरज्योत मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुण्यातील चांदणी चौक ते भूगाव रस्त्यावर नवीन उड्डाणपूल उभारणार?

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :**

कोकणातून पुणे शहरात प्रवेश करण्यासाठी वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास कमी करण्यासाठी चांदणी चौक ते भूगाव रस्ता विकसित करण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. या भागात उड्डाणपूल, तसेच समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) तयार केला जाणार असून, या दोन्ही कामांसाठी महापालिकेने २०३ कोटी रुपयांचा खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेली ८० टक्के जागा ताब्यात आल्यानंतर निविदा काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या खर्चाला महापालिकेच्या सोमवारी झालेल्या अंदाज समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

चांदणी चौकातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने यापूर्वीच



या भागातील रस्त्यांचे रुंदीकरण केले आहे. शहराचे पश्चिम प्रवेशद्वार अशी या रस्त्याची ओळख आहे. चांदणी चौकातून भूगावकडे जाताना दोन किलोमीटरपर्यंत महापालिकेची हद्द आहे. या भागात ६० मीटर रस्ता महापालिकेच्या विकास आराखड्यात दर्शविण्यात आला आहे.महापालिकेची हद्द संपल्यानंतर पुढे पीएमआरडीएचा प्रस्तावित रिंग रोड आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे चांदणी चौकातून पुढे भूगावकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करून येथे वाहतूककोंडी टाळण्यासाठी उड्डाणपूल, समतल विलगक तयार करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी ही माहिती दिली. 'या प्रकल्पासाठी काही खासगी जागांचे संपादन करावे लागणार आहे. एकूण भूसंपादनाच्या जागेपैकी ८० टक्के जागा ताब्यात आल्यानंतरच या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबिण्याचा निर्णय महापालिकेने घेतला,' असे गोजारे यांनी सांगितले.

# सानपाड्यातील दैनंदिन बाजार सज्ज; व्यावसायिकांचे स्थलांतर पूर्णत्वास, नागरिकांना मिळणार दिलासा

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई, प्रतिनिधी :** सानपाडा सेक्टर ४ मधील दैनंदिन बाजाराची दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रतीक्षा अखेर समाप्त झाली आहे. अनेक अडचणी, बैठका आणि सुधारणा प्रक्रियेनंतर बाजार नागरिकांसाठी खुला करण्यात आला असून, एकाच ठिकाणी दैनंदिन आवश्यक वस्तू उपलब्ध होणार असल्याने स्थानिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई महापालिकेने शहरातील विविध नोडमध्ये वाढत्या फेरीवाल्यांवर नियंत्रण आणि नागरिकांना नियोजित खरेदी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दैनंदिन बाजार उभारणीचे काम हाती घेतले होते. त्याच अनुषंगाने सानपाडा सेक्टर ४ मधील भूखंड क्रमांक १७ वर १०४८ चौरस मीटर क्षेत्रफळात २०१८ मध्ये बाजाराची उभारणी



सुरू झाली. कोरोनाच्या काळात कामाला वाढीव मुदत देण्यात आली आणि मार्च २०२१ मध्ये काम पूर्ण झाले. तथापि, वास्तूमध्ये हवा खेळती नसणे, तसेच स्टॉलच्या रचनेवरून व्यावसायिकांच्या आक्षेपांमुळे बाजाराचे उद्घाटन पुढे ढकलले जात होते. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार बाजाराच्या रचनेत आवश्यक बदल करण्यात आले. त्यानंतर ओटे वाटपाचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. भाजी, फळे आणि मांस विक्रीसाठी असलेल्या ५८ परवानाधारक व्यावसायिकांना स्टॉलचे वाटप पूर्ण झाले असून, स्टॉलची मांडणी बाजारातील सर्व प्रवेशद्वारांवरून दिसेल अशा पद्धतीने करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

**फेरीवाल्यांच्या गर्दीपासून सुटका**

या बाजारात भाजीपाला, फळे आणि मांस विक्रीसाठी एकूण १०५ भाजीपाला विक्रेते आणि १९ मासेविक्रेत्यांसाठी सुसज्ज ओटे, पिण्याचे पाणी, वीज आणि प्रसाधनगृह आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. या बाजारामुळे नागरिकांना नियोजित पद्धतीने खरेदीची सुविधा मिळणार आहे. अनेक वर्षांपासून बंद असलेल्या संरचनेचा प्रश्न मार्गी लागल्याने स्थानिक रहिवासीही दिलासा व्यक्त करत आहेत. त्याशिवाय रेल्वे स्थानक परिसरात बसणाऱ्या फेरीवाल्यांच्या गर्दीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रेल्वे स्थानक परिसराला यामुळे बकाल स्वरूप प्राप्त झाले होते. मात्र, आता दैनंदिन बाजार सुरू होणार असल्याने ही गर्दी कमी होणार आहे. यानिमित्ताने सानपाडा रेल्वे स्थानकही मोकळा श्वास घेईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.